पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक २५ • शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

यश मिळवण्यासाठी शिडीची नाही,तर कष्टाची गरज असते.

सिटी न्यूज सुपरफास्ट
तेल्हारा शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
कृष्णा विखे
शहर प्रतिनिधी
+91 7262838288


# अकोला जिल्ह्यावर जलसंकटाचे ढग !

## पाण्याचा थेंब न थेंब जपून वापरा! मुसळधार पावसानंतरही धरण कोरडे

### जोरदार पाऊस; सरासरीच्या ९५% टप्पा पार



अकोला — अकोला जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला असून, एकाच दिवसात ७४.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या मुसळधार सरींमुळे जून महिन्यापासून आतापर्यंत एकूण ३४४.२ मिमी पाऊस झाला असून, हे प्रमाण हंगामाच्या सरासरीच्या ९५.६% इतके आहे. अकोट तालुक्यात ५००.५ मिमी (१४३.८%) आणि तेल्हारा तालुक्यात ४४३.१ मिमी (१३१.६%) पावसाची सर्वाधिक नोंद झाली आहे. अकोटमधील अकोळखेड मंडळात ५७८.९ मिमी, तर मूर्तिजापूर तालुक्यातील मना मंडळात सर्वाधिक ६०३.८ मिमी (१६२.७%) पाऊस पडला. संपूर्ण अमरावती विभागात ४१३.० मिमी (१०६.७%) पाऊस झाल्याने जलसाठ्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे.




प्रतिनिधी ३१ जुलै

अकोला : अकोला जिल्ह्यात आज शुक्रवार,३१ जुलै रोजी सकाळी मुसळधार पावसाने हजेरी लावली असली, तरी अकोला पाटबंधारे विभागाने जाहीर केलेली ताजी आकडेवारी अत्यंत चिंताजनक आणि धक्कादायक आहे. जिल्ह्यातील मुख्य प्रकल्पांमध्ये पाण्याचा साठा अजुनही अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी असून, भीषण जलसंकटाचे संकेत स्पष्ट दिसत आहेत. जिल्ह्यात नागरी भागात अतिवृष्टीने नागरिक त्रस्त असून अकोला शहरात सर्व छोटे नाले, नाल्या दुथडी भरून वाहत आहे. रस्त्यावर पाणीच पाणी असून ज्या ठिकाणी पाणी तुंबले आहे त्या ठिकाणी महापालिका कर्मचारी आणि नगरसेवकांनी मोर्चा सांभाळला आहे. अकोलेकरांच्या मदतीला पहिले नगरसेवक आणि मग प्रशासन पोहचत असल्याचे एकूण चित्र आहे. मूर्तीजापूर तालुक्यातील उमा प्रकल्पाची स्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. धरणात अवघा २.५१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून हे धरण जवळजवळ कोरडे पडण्याच्या मार्गावर आहे. पावसाळा अर्धा संपत आला तरी या प्रकल्पात पाण्याचा थेंबही न वाढणे ही प्रशासनासाठी धोक्याची मोठी घंटा आहे. अकोला जिल्ह्यातील प्रमुख ६ प्रकल्पांपैकी एकाही धरणाचे गेट उघडण्याची वेळ आलेली नाही. काटेपूर्णासारखे मुख्य धरण अजूनही ८० टक्के रिकामे असणे हे आगामी काळात पाणीटंचाईचे गंभीर संकट उभे करू शकते. पावसाने आता जोर नाही धरला, तर अकोलेकरांना भीषण पाणीकपातीला सामोरे जावे लागेल.

### आपत्तीनिवारण कक्षाचे फोन बंद

महापालिकेच्या हद्दीत अनेक ठिकाणी नाल्या ओव्हर फ्लो झाल्या. अनेक ठिकाणी झाडे कोसळली. पण, अकोलेकरकांना महापालिकेच्या आपत्ती निवारण कक्षाचे फोन लागत नव्हते. त्यामुळे अकोलेकरांनी तीव्र संताप व्यक्त केला. आज कुठलीही शासकीय सुट्टी नसताना महापालिकेच्या आपत्ती निवारण कक्षासोबत संपर्क का होत नाही अशी संपप्त विचारणा अकोलेकर करत आहे.

### प्रकल्पनिहाय पाण्याची स्थिती (३१ जुलै, सकाळी ७:०० वा.)




#### १. काटेपूर्णा प्रकल्प

अकोला शहराची तहान भागवणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पाची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे.
**उपयुक्त साठा:** अवघा २०.८५ टक्के अर्थात १८ दशलक्ष घनमीटर
**आजचा पाऊस: ५२ mm**
(एकूण पाऊस: २०० mm)
**सध्याची पातळी:** ३४१.०१ मी
सद्यस्थिती:
पावसाने थोडी हजेरी लावली असली तरी धरण अजूनही ८०mm रिकामेच आहे! सर्व गेट्स पूर्णपणे बंद आहेत.

#### २. मोर्णा प्रकल्प

(पावसाचा तडाखा, पण साठा निम्म्यावरच)
पातूर तालुक्यात तब्बल १३७ मिमी इतका धुवाधार पाऊस झाला असला, तरी प्रकल्पातील साठा अजूनही समाधानकारक नाही.
उपयुक्त साठा: ५६.८२ mm (२३.५६ mm ३ )
आजचा पाऊस: १३७ mm (एकूण ४७३ mm)

#### ३. वान प्रकल्प,

तेल्हारा (काहीसा दिलासा, तरीही सतर्कतेची गरज) तेल्हारा तालुक्यात मुसळधार १०९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.
उपयुक्त साठा: ५३.०२mm (४३.४५ mm ३ )
एकूण पाऊस: ५११ mm
सद्यस्थिती: ५० टक्क्यांचा टप्पा ओलांडला सर्व गेट्स सध्या बंदच ठेवण्यात आले आहेत.

#### इतर प्रकल्पांची अति-चिंताजनक आकडेवारी

प्रकल्प जलपातळी (मी) उपयुक्त साठा साठा (mm) आजचा पाऊस स्थिती
दगडपारवा ३१५.५५ ४.६१ द.ल.घ.मी. ४५.३३ड्ड २० मिमी सर्व गेट बंद
निर्गुणा (पातूर) ३८६.०० १०.७६ द.ल.घ.मी. ३७.३० mm०० मिमी पाऊस नाही, साठा खालावला
उमा (मूर्तीजापूर) ३३७.५५ ०.२९३ द.ल.घ.मी. २.५१ mm २० मिमी कोरडे ठाक (तळाला)

# भिवंडी इमारत दुर्घटनेबाबत तत्काळ गुन्हा दाखल करा- मुख्यमंत्री फडणवीस

## महापालिका प्रशासनाला दिले कारवाईचे आदेश

प्रतिनिधी ३१ जुलै

भिवंडी : भिवंडी शहरातील बालाजी नगर, गंगारामवाडी परिसरातील 'कोहिनूर अपार्टमेंट' ही चार मजली इमारत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश देत दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली आहे. गंगारामवाडी येथील १२ ते १४ वर्षे जुनी असलेली 'कोहिनूर अपार्टमेंट' ही इमारत अचानक ३० जुलैच्या कोसळल्याने मोठी खळबळ उडाली. या भीषण दुर्घटनेत आतापर्यंत ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ढिगाऱ्याखाली अजूनही २ ते ३ जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशमन दल, आपत्कालीन व्यवस्थापन पथक आणि स्थानिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या इमारतीच्या पिलरच्या (खांब) दुरुस्तीचे काम सुरू असतानाच ही इमारत अचानक कोसळली. विशेष म्हणजे, ही इमारत धोकादायक झाली असल्याचे ओळखून भिवंडी-निझामपूर शहर महानगरपालिकेने यापूर्वीच तिला धोकादायक घोषित करून नोटीस बजावली होती. असे असूनही ही दुर्घटना घडल्याने प्रशासनाच्या कारभारावर आणि निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिल्यामुळे आता प्रशासनाकडून नेमकी काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बाळापुरात नद्यांना आले रौद्ररुप!

## मन, निर्गुणा आणि महेश नद्या वाहतात दुथडी भरून !

प्रतिनिधी ३१ जुलै



बाळापूर : बाळापूर तालुका आणि परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे मन, निर्गुणा आणि महेश या तिन्ही प्रमुख नद्यांना दुथडी भरून वाहत आहे. पुराच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली असून, बाळापूर शहरासह लगतच्या अनेक गावांना पुराचा मोठा विळखा पडला आहे.

रात्रभर झालेल्या मुसळधार पावसाने नद्यांवरील पुलांवरून पुराचे पाणी वेगाने वाहू लागल्याने अनेक मार्गांवरील वाहतूक पुर्णपणे ठप्प झाली असून काही गावांचा संपर्क तुटल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, स्थानिक प्रशासन, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन तातडीने ?क्शन मोडमध्ये आले आहे.

नदीकाठी राहणाऱ्या सर्व नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाकडून लाऊडस्पीकरद्वारे नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि नदीपात्राकडे न जाण्याचे आवाहन केले जात आहे. नदीकाठच्या रहिवाशांनी तात्काळ सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधावा. आपत्ती व्यवस्थापन पथक परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून असून बचावकार्यासाठी सज्ज झाले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास पाणीपातळी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# राज्यात पुन्हा निवडणुकीचं बिगुल वाजणार!

## प्रलंबित जिल्हा परिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायतींसाठी होणार मतदान

प्रतिनिधी ३१ जुलै



**मुंबई** : महानगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुकांचा धुरळा खाली बसून काही महिने होत नाहीत, तोच पुन्हा एकदा राज्यात निवडणुका होणार आहेत. राज्यातील १२ हजारांच्या आसपास ग्रामपंचायती, ओबीसी आरक्षणाच्या पेचामुळे प्रलंबित असलेल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि मुदत संपलेल्या १०५ नगर पंचायती यांच्या निवडणुका वर्षअखेरीस किंवा जानेवारी, २०२७मध्ये घेण्यात येणार आहेत.

राज्यात मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी मोहीम (एसआयआर) सुरू असून त्याची अंतिम मुदत ऑक्टोबर आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाकडून या निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला, तरी प्रत्यक्षात निवडणुका होण्यास वर्षअखेर किंवा नववर्ष उजाडण्याची दाट शक्यता आहे. ओबीसी आरक्षणामुळे काही जिल्ह्यांमध्ये एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या मर्यादेत असलेल्या ठिकाणी निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. नुकत्याच झालेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान, उर्वरित निवडणुका ऑगस्टअखेर किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत घेणे शक्य आहे का, याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, असे निर्देश दिले होते.

राज्यात एसआयआरचे काम युद्धपातळीवर सुरू असून नुकतीच भारत निवडणूक आयोगाने त्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार अंतिम मतदारयाद्या जाहीर करण्याची मुदत १९ ऑक्टोबर आहे. त्यामुळे राज्यातील निवडणूक अधिकारी आणि बीएलओ त्यात व्यग्र आहेत. या परिस्थितीत निवडणुका घेणे शक्य नाही. तसेच, जवळपास १०५ नगर पंचायती आणि १२ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत डिसेंबरअखेर, तसेच जानेवारी २०२७मध्ये पूर्ण होत आहे. त्यामुळे, या सर्व गोष्टींचा विचार करता, या निवडणुका डिसेंबरअखेरीस किंवा जानेवारी, २०२७मध्ये घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने सुरू केल्याचे कळते.

**प्रलंबित निवडणुका**

**जिल्हा परिषदा : २०**
**पंचायत समित्याः २११**
**नगर पंचायती : १०५**
**ग्रामपंचायती: सुमारे १२ हजार**

सध्या राज्यभर 'एसआयआर' मोहीम सुरू असून त्याच्या मध्यातच निवडणुका घेणे संयुक्तिक राहणार नाही. मतदारयाद्या अद्ययावत झाल्यावर त्याचाच आधार घेत या निवडणुका घेता येतील. त्यामुळेच ही संपल्यानंतर निवडणुका होण्याची शक्यता आहे.

- निवडणूक आयोगातील अधिकारी

# मनपाची आपत्कालीन यंत्रणा सज्ज!

**अकोला :** अकोला शहरात सुरू असलेल्या धुवांधार पावसामुळे निर्माण होणारी संभाव्य पूरस्थिती लक्षात घेता अकोला महानगरपालिकेने आपली संपूर्ण आपत्कालीन यंत्रणा सतर्क केली आहे. शहरातील चारही झोनमध्ये स्वतंत्र आपत्कालीन पथके नियुक्त करण्यात आली असून, नागरिकांच्या मदतीसाठी विशेष नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी यासाठी मनपा प्रशासनाने अग्निशमन दलाचे दोन संपर्क क्रमांक तसेच टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक जाहीर केला आहे. शहरात पूर, सखल भागात पाणी साचणे, झाडे कोसळणे किंवा विद्युत धोका निर्माण झाल्यास नागरिकांनी तात्काळ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी केले आहे. हेल्पलाईनवर संपर्क होण्यास अडचण आल्यास अथवा प्रतिसाद न मिळाल्यास नागरिकांनी थेट महापौर, उपमहापौर, सभागृह नेते किंवा स्थायी समिती सभापती यांच्याशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले

# भाजी बाजारात घाणीचे साम्राज्य ताजी भाजी की आजारपण ?

प्रतिनिधी ३१ जुलै



अकोला : दररोज ताजी आणि सकस भाजी खरेदी करण्यासाठी नागरिक भाजी बाजारात जातात. मात्र, सध्या शहरातील भाजी बाजारात शिरल्यावर 'तुम्ही ताज्या भाजीसोबत घरी एखादा गंभीर आजार तर घेऊन जात नाही ना?' असा धसका घेण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. बाजारात पसरलेले घाणीचे साम्राज्य, चिखलाचा विळखा आणि पसरलेल्या दुर्गंधीमुळे भाजी बाजारात पाऊल ठेवणेही अशक्य झाले आहे.

सध्या पावसामुळे भाजी बाजारातील रस्त्यांची अक्षरशः दैनावस्था झाली आहे. भाजीपाल्याचा सडलेला कचरा, साचलेले पावसाचे पाणी आणि त्यात झालेला चिखल यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. ग्राहकांना तसेच व्यापाऱ्यांना या चिखलातूनच कसरत करत खरेदी-विक्री करावी लागत आहे. अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारेच नसल्याने साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत आहे. चिखलात पडलेली, दूषित पाण्याचे फवारे बसलेली भाजी खरेदी करून घरी नेल्यास डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो किंवा त्वचेचे आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

नागरिक आरोग्यासाठी भाजीपाला खातात, मात्र याच भाजी बाजारातून आजारपण घरात येण्याचा धोका निर्माण झाला आहे. महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक आणि संबंधित विभाग या परिस्थितीकडे उघड्या डोळ्यांनी पाहत असूनही कोणतीही उपाययोजना केली जात नाही.

व्यापाऱ्यांकडून नियमित कर वसूल केला जातो, मात्र सुविधांच्या नावाने शून्यता आहे. प्रशासनाने तातडीने भाजी बाजाराची स्वच्छता करून चिखलाचा बंदोबस्त करावा, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

तुम्ही रोजच्या स्वयंपाकासाठी भाजी बाजारात जात असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भाजी बाजारात जाऊन तुम्ही ताजी भाजी आणत आहात की सोबत एखादा भयानक 'आजार' घरी घेऊन येत आहात? असा सवाल विचारण्याची वेळ आली आहे. कारण भाजी बाजारात सर्वत्र चिखल, तुंबलेले पाणी आणि घाणीचे साम्राज्य पसरले आहे. प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे भाजी बाजार सध्या आजारांचे माहेरघर बनला आहे!

## करिअरच्या पर्यायांचा करा विचार

मागील वर्षापासून अनेक गोष्टी झपाट्याने बदलत आहेत आणि प्रत्येक जण 'न्यू नॉर्मलशी' आपापल्यापरीनं जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेक पिढ्यांची प्रार्थना खरी ठरावी आणि विद्यार्थ्यांना काहीशी दिलासादायक बातमी मिळावी ती म्हणजे रद्द झालेल्या परीक्षा! अनिश्चितता आणि तारखांमधील सततच्या बदलांमुळे 'बोर्ड एक्सामस्च्या' गांभीर्यपिक्षा 'बोअर्ड ऑफ एक्साम्स' अशी काहीशी विद्यार्थ्यांची मनस्थिती निर्माण झाली आहे. खरंच परीक्षेची किती तयारी झाली आहे यापेक्षा लवकरात लवकर परीक्षा देऊन टाकू, जेणेकरून अभ्यास करायचा की नाही करायचा हा गोंधळ तरी संपेल असं जवळजवळ प्रत्येक विद्यार्थ्याला वाटत असेल. या बदलाची सुरुवात केवळ एका बोर्डाच्या निर्णयानं जरी झालेली असली तरी बोर्ड परीक्षा रद्द होण्याची कल्पना वास्तवात येईल असं खरंच कोणाला वाटलं नव्हतं. या निर्णयामुळे विद्यार्थ्यात स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली.

# भारतातील एक अष्टपैलू पार्श्वगायक : मोहम्मद रफी

हे लोकप्रिय भारतीय पार्श्वगायक होते. त्यांना भारतीय उपखंडातील महान आणि प्रभावी गायकांपैकी एक मानले जाते. मोहमद रफी त्यांच्या आवाज, अष्टपैलुपणा आणि श्रेणीसाठी उल्लेखनीय होते; त्यांच्या गाण्यांमध्ये वेगवान पेपी नंबर ते देशभक्तीपर गीते, दर्द असणारी गाणी, अत्यंत रोमँटिक गाणी, कव्वाली ते गझल आणि भजनांमध्ये शास्त्रीय गाणी अशी विविधता होती. एखाद्या अभिनेत्याच्या व्यक्तिरेखेवर आणि शैलीनुसार आपला आवाज काढण्याच्या क्षमतेसाठी, चित्रपटात स्क्रीनवर गाण्याचे लिप-सिंक करून दाखवणासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी हिंदी भाषा, उर्दू, पंजाबी, मराठी आणि तेलुगू भाषांमधून गाणी गायली, पण ते आपल्या हिंदी चित्रपटांतील गाण्यांसाठी अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांची गाणी भारतात, तसेच भारताच्या बाहेर स्थायिक असलेल्या भारतीयांमध्ये लोकप्रिय आहेत. मुकेश, किशोर कुमार, मन्ना डे, महेंद्र कपूर, हेमंत कुमार मुखोपाध्याय आणि तलत मेहमूद यांच्याप्रमाणेच ते हिंदी चित्रपटांच्या १९५० ते १९८० च्या दशकांमधले एक प्रमुख पार्श्वगायक होते.

हाजी अली मोहम्मदला जन्मलेल्या सहा भावांमध्ये मोहम्मद रफी हे दुसऱ्या नंबरचे होते. हे कुटुंब मूळचे कोटला सुलतान सिंग या खेड्यातील होते. हे गाव सध्याच्या पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील मजीठा जवळ आहे. रफी, ज्याचे टोपणनाव फेकिो होते, कोटला सुलतान सिंग या त्यांच्या जन्मगावी त्यांच्या गल्लीमध्ये एक फकीरच्या मंत्रांचे अनुकरण करून त्यांनी गाणे सुरू केले. रफीने उस्ताद अब्दुल वहीद खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी यांच्याकडून शास्त्रीय संगीत शिकले. त्यांची पहिली सार्वजनिक कामगिरी वयाच्या १० व्या वर्षी झाली जेव्हा त्यांनी लाहोरमध्ये के. एल. सैगल यांचे गीत गायले होते. १९४१ मध्ये मोहमद रफीने लाहोरमध्ये संगीत दिग्दर्शक श्याम सुंदर यांच्या नेतृत्वात 'बलिया बलूच' (१९४४ मध्ये रिलीज झालेल्या) पंजाबी चित्रपट 'झीनत बेगम' यांच्याबरोबर 'सोनिया नी, हीरिये नी' या गाण्याचे पार्श्वगायक म्हणून लाहोरमध्ये पदार्पण केले. त्याच वर्षी त्यांना ऑल इंडिया रेडिओ लाहोर स्टेशनने त्यांच्या गाण्यासाठी आमंत्रित केले होते. १९४५ मध्ये 'गाओन की गोरी' मधून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले.

१९४४ मध्ये रफी बॉम्बे (आताचे मुंबई), महाराष्ट्रात गेले. त्यांनी आणि हमीद साहबने गर्दीच्या भेंडीबाजार परिसरातील दहा बाय दहा फूट खोली भाड्याने घेतली. कवी तनवीर नक्वी यांनी त्यांची ओळख अब्दूर रशीद करदार, मेहबूब खान आणि अभिनेता-दिग्दर्शक नाझीर यांच्यासह अनेक चित्रपट निर्मात्यांशी केली. श्याम सुंदर बॉम्बेमध्ये होते आणि त्यांनी रफीला जी. एम. दुर्रानी यांच्याबरोबर गाव की गोरी चित्रपटातील युगल गीत गाण्याची संधी दिली, 'आज दिल हो काबू में तो दिलदार की ऐसी तैसी ...,' ,हे हिंदी चित्रपटातील रफीचे पहिले रेकॉर्ड गाणे बनले. इतर गाणी त्यानंतर आली. नौशादसोबत रफीचे पहिले गाणे 'आम्ही हिंदुस्तानचे के हम है ' श्याम कुमार, अलाउद्दीन आणि इतरांसह, येथून. ए. आर . कारदारचा पहिला आप (१९४४) याच काळात रफीने १९४५च्या 'गाव की गोरी' या चित्रपटाचे आणखी एक गाणे रेकॉर्ड केले, 'आज दिल हो कबू में'. हे गाणे हे त्यांचे हिंदी भाषेचे पहिले गाणे मानले गेले. मोहमद रफी दोन सिनेमांमध्ये दिसले. लैला मजनू (१९४५) मधील 'तेरा जलवा जीस ने देखा' आणि जुग्नू (१९४७) मधील 'वो अपना याद दिलाने को' या चित्रपटातील गाण्यांसाठी ते पडद्यावर दिसले. शाहजहां (१९६६) या चित्रपटातील के. एल. सैगल यांच्यासमवेत 'मेरे सपना की रानी, रुही रुही' या गाण्यासमवेत कोरस म्हणून त्यांनी नौशादसाठी बरीच गाणी गायली. मोहमद रफीने मेहबूब खानच्या अनमोल घडी (१९४६) मधील 'तेरा खिलोना टूटा बालक' आणि १९४७ च्या 'जुगनु या चित्रपटात 'बदला वाफा का' नूर जहां यांच्याबरोबर गाणी गायले होती. फाळणीनंतर रफीने परत भारतात रहाण्याचा निर्णय घेतला आणि बाकीचे कुटुंब मुंबईला गेले. नूर जहांने पाकिस्तानात स्थलांतर केले आणि प्लेबॅक गायक अहमद रुश्दीबरोबर जोडी बनविली.

१९४९ मध्ये, मोहमद रफी यांना नौशाद (चांदनी रात, दिल्लगी आणि दुलारी) श्याम सुंदर (बाजार) आणि हुस्नालाल भगतराम (मीना बाजार) सारख्या संगीत दिग्गजांनी गाणी गायला दिली. के. एल. सैगल यांच्याशिवाय जी. एम. दुर्राणी यांनाही त्याचा प्रभाव पडला. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात, मोहमद रफी यांनी अनेकदा दुर्रानी यांच्या गायनाच्या शैलीचे अनुकरण केले, परंतु नंतर त्यांची स्वतःची, अनोखी शैली विकसित झाली. 'हमको हंसते देख जमाना जलता है' आणि 'खबर कीस को नहीं, वो किधर देखते' (बेकासूर, १९५०) अशा काही गाण्यांमध्ये त्यांनी दुर्रानी यांच्याबरोबर गायली. १९४८ मध्ये, महात्मा गांधींच्या हत्येनंतर हुसनलाल भगतराम-राजेंद्र कृष्ण-रफी यांच्या पथकाने रातोरात 'सुनो ऐनो दुनियायावालों, बापूजी की अमर कहानी' हे गाणे तयार केले होते. त्यांना भारतीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या घरी गाण्यासाठी आमंत्रित केले होते. १९४८ मध्ये रफी यांना जवाहरलाल नेहरूंकडून भारतीय स्वातंत्र्यदिनी रौप्यपदक मिळाले.

मोहमद रफी यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, त्यांचे अनेक समकालीन संगीत दिग्दर्शकांशी संबंध होते, मुख्य म्हणजे नौशाद अली. १९५० आणि १९६० च्या उत्तरार्धात त्यांनी ओ. पी. नय्यर, शंकर जयकिशन, एस.डी. बर्मन आणि रोशन या काळातील इतर संगीतकारांसोबत काम केले. मोहमद रफी हे त्यांच्या अनेक समकालीन गायकांशी संबंधित होते , त्यांच्याबरोबर युगल गायन करत असत आणि कधी कधी त्यांच्यासाठी (किशोर कुमार जो अभिनेता होता तसे) गायनही करीत असत. मोहमद रफी यांनी आशा भोंसले (महिला), मन्ना डे (पुरुष) आणि लता मंगेशकर (महिला) यांच्यासह सर्वाधिक युगल गीत गायली.

१९७० च्या दशकात मोहमद रफी यांच्या घशाला संसर्ग झाला. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात, मोहमद रफी यांनी कमी गाणी रेकॉर्ड केली. १९७० च्या दशकात मोहमद रफी यांनी अग्रगण्य गायक म्हणून पुनरागमन केले. १९७४ मध्ये उषा खन्ना यांनी संगीत दिलेल्या 'तेरी गलियां मेंना रखेंगे कदम आज के बाद' (हवस, १९७४) गाण्यासाठी फिल्म वर्ल्ड मासिकाचा बेस्ट सिंगर अवॉर्ड जिंकला. १९७६ मध्ये मोहमद रफी यांनी लैला मजनू या हिट चित्रपटात ऋषी कपूरसाठी सर्व गाणी गायली होती. त्यानंतरच्या हिट चित्रपटांमध्ये रफीने ऋषी कपूर यांच्यासाठी बरीच गाणी गायली.



## गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा वाद

आपल्या शेवटच्या वर्षांत मोहमद रफी लता मंगेशकरच्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये दाखल झाल्याच्या वादात अडकले होते. ११ जून १९७७ रोजी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डला लिहिलेल्या पत्रात, लता मंगेशकर यांनी सर्वाधिक गाणी रेकॉर्ड केली आहेत (गिनिजनुसार '२५,००० पेक्षा कमी नाही'), असा दावा मोहमद रफीने आव्हान केला होता. मोहमद रफीने यांच्या चाहत्यांनुसार लतादीदीं पेक्षा मोहमद रफी यांनी जास्त गाणी गायली कारण ते दोघांमध्ये वरिष्ठ आहेत. मोहमद रफी यांनी गायलेल्या गाण्यांची संख्या २५००० ते २६००० इतकी आहे असा त्यांचा अंदाज आहे. यामुळे मोहमद रफी गिनीस विरोधात पत्र लिहिण्यास उद्युक्त झाले.२० नोव्हेंबर १९७९ रोजी गिनसकडून उत्तर मिळाल्यानंतर त्यांनी लिहिले की, 'मंगेशकर यांच्या नोंदविलेल्या विश्वविक्रमाच्या पुनर्मुल्यांकन करण्याच्या माझ्या विनंतीकडे दुर्लक्ष झाल्याने मी निराश आहे.' नोव्हेंबर १९७७ मध्ये बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत रफीने तोपर्यंत २५००० ते २६००० गाणी गायल्याचा दावा केला. रफीच्या निधनानंतर, १९८४ च्या आवृत्तीत, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने लता मंगेशकर यांचे नाव 'मोस्ट रेकॉर्डिंग्ज' दिले आणि सांगितले की, 'मोहम्मद रफी (दि. १ ऑगस्ट १९८०) यांनी १९४४ ते १९८० दरम्यान ११ भारतीय भाषांमध्ये २८०००० गाणी रेकॉर्ड केल्याचा दावा केला आहे. मोहमद रफी आणि लता मंगेशकर या दोघांसाठीही गिनीज बुकच्या नोंदी अखेरीस १९९१ मध्ये हटविण्यात आल्या. २०११ मध्ये लता मंगेशकरांची बहीण आशा भोसले यांना ही पदवी देण्यात आली.

## मोहम्मद रफी यांचा मृत्यू

३१ जुलै १९८० रोजी मोठ्या हृदयविकाराच्या झटक्यानंतर मोहम्मद रफी यांचे रात्री १०.२५ वाजता निधन झाले. त्यावेळी ते फक्त ५५ वर्षांचे होते. रफीने गायलेले शेवटचे गाणे आस पास या चित्रपटाचे होते. एका स्रोताने म्हणले आहे की, 'शाम फिर क्यू उदास है दोस्त / तू कहि आस पास है दोस्त', हे त्याच्या मृत्यूच्या काही तास आधी रेकॉर्डिंग केले गेले होते. दुसऱ्या एक स्रोताचे म्हणणे आहे की याच चित्रपटातील 'शेहर में चरचा है' हे त्यांचे शेवटचे गाणी होते. मोहमद रफी यांना जुहू मुस्लिम स्मशानभूमीत दफन करण्यात आले आणि त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी १०,००० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते आणि त्यांचा अंत्यविधी हा भारतातील सर्वात मोठा अंत्यविधी होता त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने दोन दिवस जाहीर शोक व्यक्त केला.

# आधी राज्याचे मुख्यमंत्री अन् नंतर देशाचे पंतप्रधान!


## भारत घडवणाऱ्या सहा दिग्गजांचा इतिहास











भारताच्या राजकीय इतिहासात अशा ६ महान नेत्यांचा समावेश आहे, ज्यांनी आधी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून धुरा सांभाळली आणि नंतर देशाचे पंतप्रधानपद भूषवले. यात मोरारजी देसाई, चौधरी चरण सिंग, व्ही. पी. सिंग, पी. व्ही. नरसिंह राव, एच. डी. देवेगौडा आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समावेश आहे.

भारतीय लोकशाहीत राज्याच्या मुख्यमंत्रिपदाचा अनुभव देशाचे नेतृत्व करताना अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारताच्या राजकीय इतिहासात आतापर्यंत अशा ६ दिग्गज नेत्यांनी काम केले आहे, ज्यांनी प्रथम एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून नेतृत्व केले आणि पुढे जाऊन देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. मोरारजी देसाई यांच्यापासून ते देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंतच्या या ६ महान नेत्यांचा कार्यकाळ आणि इतिहास असा आहे.

### १. मोरारजी देसाई

मोरारजी देसाई हे भारताचे चौथे पंतप्रधान आणि देशाचे पहिले बिगर-काँग्रेसी पंतप्रधान होते. त्यांचा जन्म २९ फेब्रुवारी १८९६ रोजी गुजरातच्या वलसाड जिल्ह्यातील भदेली गावात झाला, तर १० एप्रिल १९९५ रोजी त्यांचे निधन झाले. ते आपल्या कठोर शिस्तीसाठी, तत्त्वनिष्ठतेसाठी आणि गांधीवादी विचारसरणीसाठी ओळखले जात असत. पंतप्रधान होण्यापूर्वी, १९५२ मध्ये ते तत्कालीन मुंबई (बॉम्बे) प्रांताचे मुख्यमंत्री होते.

### २. चौधरी चरण सिंग

चौधरी चरण सिंग हे भारताचे पाचवे पंतप्रधान, महान शेतकरी नेते आणि स्वातंत्र्यसेनानी होते. 'शेतकऱ्यांचे कैवारी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चौधरी चरण सिंग यांच्या जयंतीनिमित्त भारतात दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' (किसान दिन) म्हणून साजरा केला जातो. २०२४ मध्ये त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' या भारताच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित करण्यात आले. त्यांनी दोन वेळा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून पदभार सांभाळला होता. उत्तर प्रदेशचे पहिले बिगर-काँग्रेसी मुख्यमंत्री होण्याचा मानही त्यांना मिळाला.

### ३. व्ही. पी. सिंग

विश्वनाथ प्रताप सिंह (व्ही. पी. सिंग) हे भारताचे ७ वे पंतप्रधान आणि मांडा संस्थानाचे राजे होते. त्यांनी २ डिसेंबर १९८९ ते १० नोव्हेंबर १९९० या काळात देशाचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले. ते त्यांच्या साधेपणासाठी आणि 'मंडल आयोगाच्या' शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी विशेष ओळखले जातात. पंतप्रधान होण्यापूर्वी ९ जून १९८० ते २८ जून १९८२ या काळात ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते.

### ४. पी. व्ही. नरसिंह राव

पामुलपर्ती वेंकट नरसिंह राव (पी. व्ही. नरसिंह राव) हे भारताचे ९ वे पंतप्रधान, कुशल राजकारणी आणि 'आधुनिक भारताच्या आर्थिक सुधारणांचे शिल्पकार' होते. त्यांचा जन्म २८ जून १९२१ रोजी झाला, तर वयाच्या ८३ व्या वर्षी म्हणजेच २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. १९७१ ते १९७३ या काळात त्यांनी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी परराष्ट्र, गृह, संरक्षण आणि मनुष्यबळ विकास यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली होती. त्यांनी २१ जून १९९१ ते १६ मे १९९६ या काळात भारताचे पंतप्रधानपद भूषवले.

### ५. एच. डी. देवेगौडा

हरदनहल्ली डोडेगौडा देवेगौडा (एच. डी. देवेगौडा) हे भारताचे ११ वे पंतप्रधान आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आहेत. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेले देवेगौडा हे भारतीय राजकारणातील ज्येष्ठ व अनुभवी नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी १९९४ ते १९९६ या काळात कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. त्यानंतर १ जून १९९६ ते २१ एप्रिल १९९७ या काळात त्यांनी भारताचे ११ वे पंतप्रधान म्हणून देश सांभाळला.

### ६. नरेंद्र मोदी

नरेंद्र दामोदरदास मोदी हे भारताचे विद्यमान पंतप्रधान आहेत. ते २०१४ पासून या पदावर कार्यरत असून भारतीय जनता पक्षाचे (भाजप) प्रमुख नेते आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतात जन्मलेले ते देशाचे पहिले पंतप्रधान आहेत. २६ मे २०१४ रोजी त्यांनी पहिल्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यापूर्वी ऑक्टोबर २००१ ते मे २०१४ पर्यंत ते सलग गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. २०१४ नंतर २०१९ आणि २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सलग विजय मिळवून ते पंतप्रधानपदी कार्यरत आहेत.

# शेतकऱ्यांना फक्त 40 रुपयात मिळणार पीकविमा



'पंतप्रधान पीक विमा योजनेत सीएससी केंद्रावर विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी ४० रुपये शुल्क केंद्र सरकारने निश्चित केले आहे. शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त इतर शुल्क देऊ नये,' असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. 'विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे,' असेही आवाहन विभागाने केले आहे. सर्व पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के आहे.

'नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टीने राज्यात पंतप्रधान पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यांत पीक विमा योजना भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे.

खरिपातील भात (धान) ज्वारी, बाजरी, नाचणी (राणी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या पिकांसाठी शेतकऱ्यांना भाग घेता येईल,' असे विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांनी स्पष्ट केले.

'योजनेत भाग घेण्यासाठी ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई- पीक पाहणी बंधनकारक आहे. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभाग ऐच्छिक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ?ग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक, ७-१२ उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र बँकेत देणे आवश्यक आहे. याशिवाय सामान्य सुविधा केंद्र (सीएससी), आपले सरकार सुविधा केंद्र येथे अर्ज भरता येईल. असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# आधुनिक मुंबईचे शिल्पकार जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट

## आज स्मृतिदिन



जगन्नाथ शंकरशेट यांचा जन्म मुंबईत दैवज्ञ ब्राह्मण सोनार या व्यापारी व सावकारी कुटुंबात झाला. पूर्वजांप्रमाणे त्यांनी व्यापार केला व अतिशय विश्वासू आणि प्रामाणिक व्यापारी असल्याची ख्याती मिळविली. अनेक अरब, अफगाणी तसेच इतर परदेशी व्यापारी आपली भारतातील मालमत्ता बँकांकडे न देता शंकरशेट यांच्या हवाली करीत. १० फेब्रुवारी १८०३ रोजी नाना शंकर शेठ यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांनी व्यापारामध्ये मोठी संपत्ती मिळवलेले होते. त्यामुळे नानांचा बालपण हे अतिशय संपन्नतेमध्ये गेलं. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील मुंबई इलाख्याच्या सार्वजनिक जीवनात त्यांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. या कार्यात त्यांना अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. आपल्या संपत्तीची खरी गरज ही सामान्य माणसाच्या उद्धारासाठी व्हावी, या हेतूने त्यांनी लोकसेवेचे व्रत घेऊन सामाजिक सुधारणेच्या पायाभरणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

त्यांनी स्वतः मिळवलेल्या अमाप संपत्तीपैकी मोठा हिस्सा दान केला तसेच सार्वजनिक कामांकरिता खर्च करून टाकला.एक थोर समाजसेवक, शिक्षणप्रेमी व आधुनिक मुंबईच्या शिल्पकारांपैकी एक. त्यांचे पूर्ण नाव जगन्नाथ शंकरशेट मुरकुटे, तथापि ते नाना शंकरशेट या नावानेच अधिक परिचित आहेत. त्यांचा जन्म एका दैवज्ञ ब्राह्मण सोनार व्यापारी कुटुंबात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड गावी झाला. त्यांचे वडील व्यापारासाठी मुंबईस आले. म्हैसूरच्या १७९९ च्या टिपू-इंग्रज युद्धात वडिलांना अमाप पैसा मिळाला. आई भवानीबाई नानांच्या लहानपणीच वारली. नानांनी तिच्या स्मरणार्थ पुढे भवानी शंकर मंदिर व एक धर्मशाळा गोवालिया तलावाजवळ बांधली.

नानांचे वडील १८२२ मध्ये वारले व तरुणपणीच त्यांच्यावर प्रपंचाची व व्यापाराची सर्व जबाबदारी पडली. नाना शंकरशेट यांनी जवळजवळ अर्धशतकाच्या कालावधीत मुंबईच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा, राजकीय चळवळीचा आणि अनेकविध अशा लोककल्याणकारी सुधारणांचा पाया घातला.त्यांच्यावर सर जमशेटजी जिजीभाईंची छाप पडली होती. हिंदवासियांत शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, यासाठी एल्फिन्स्टनने १८२२ मध्ये हैंदशाळा व शाळापुस्तक मंडळी काढली, त्यांचे आधारस्तंभ नानाच होते. ही पहिली शैक्षणिक संस्था स. का. छत्रे यांच्या साह्याने स्थापिली. पुढे हिचे १८२४ मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीत रूपांतर झाले. एल्?फिन्स्टननंतर उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी ४,४३,९०१ रुपयांचा एलफिन्स्टन फंड जमविण्यात आला. त्याचे नाना हे विश्वस्त राहिले. या संस्थेचे एलफिन्स्टन कॉलेज झाल्यावर (१८३७) तिला एलफिन्स्टन इन्स्टिट्यूट म्हणण्यात येऊ लागले. १८५६ मध्ये महाविद्यालय व विद्यालय पृथक झाले. बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना १८४१ मध्ये झाली. बोर्डातील तीन एतद्देशीय सभासदांत सतत सोळा वर्षे नाना निवडून आले. स्ट्यूडंट्स लिटररी व सायन्टिफिक सोसायटी (१८४८) आणि जगन्नाथ शंकरशेट मुलींची शाळा (१८४९) या त्यांनी स्वतःच्या वाड्यात चालू केल्या; १८५७मध्ये, द जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल सुरू केले. १८५५मध्ये त्यांनी विधी महाविद्यालयाचा पाया घातला. सर ग्रँटच्या मृत्यूनंतर ग्रँट मेडिकल कॉलेजची १८४५मध्ये स्थापना करून येथे आंग्ल वैद्यक-शिक्षणाची सोय त्यांनी केली व तेही पुढे मराठीतून देण्याची व्यवस्था केली. ॲग्रि-हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया व जिऑग्रॅफिकल सोसायटी या संस्थांचे प्रमुख व अध्यक्ष नाना शंकरशेट होते. या शैक्षणिक कामाशिवाय त्यांनी १८५२ मध्ये द बॉबे असोसिएशन स्थापण्यात पुढाकार घेतला. मुंबई कायदे मंडळाच्या आरंभीच्या सभासदांत ते प्रमुख होते.नानांचे सामाजिक कार्यही मोठे आहे. त्यांनी सतीच्या चालीस बंदी घालणाऱ्या कायद्यास पाठिंबा दिला. सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे, या तत्त्वावर स्त्रीशिक्षणास प्राधान्य दिले. भारतीयांना कलाशिक्षण मिळावे, म्हणून सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या स्थापनेत सक्रिय भाग घेतला. याशिवाय ग्रँड ज्यूरीत भारतीयांचा समावेश व्हावा, तसेच जस्टिस ऑफ द पीस अधिकार भारतीयांस मिळावा, यासाठी त्यांनी खटपट केली व काही अधिकार मिळविले. महानगरपालिकेत आयुक्त असताना त्यांनी आरोग्यव्यवस्था, विहिरी, तलाव वगैरे योजना अंमलात आणल्या. गॅस कंपनी सुरू केली; धर्मार्थ दवाखाना काढून तसेच पुढे जे.जे. हॉस्पिटलचा पाया घालून त्यांनी रुग्णसेवेस चालना दिली.

बॉबे स्टीम नेव्हिगेशन कंपनीची स्थापना, मुंबई-ठाणे रेल्वेचा प्रारंभ, नाटकांचे प्रेक्षागृह, सोनापूरच्या स्मशानभूमीचे रक्षण याही गोष्टींचे श्रेय नानांनाच द्यावे लागेल. नानांनी अनेक मान्यवर संस्थांना देणग्या दिल्या. देशाच्या सर्वांगीण सुधारणेच्या साऱ्या चळवळींत पुढाकार घेणाऱ्या या थोर पुरुषाचा पुतळा जिजामाता बागेत उभारण्यासाठी लोकांनी स्वेच्छेने २५,००० रु जमविले होते. १८५७ मध्ये आलेले किटाळ पूर्णतः दूर होऊन त्यांचे कार्य अधिकच चमकले. नानांचे वयाच्या बासष्टाव्या वर्षी ३१ जुलै १८६२ मध्ये मुंबईत देहावसान झाले. नानांच्या स्मरणार्थ मॅट्रिकला संस्कृत विषयात पहिला येणाऱ्या विद्यार्थास शंकरशेट शिष्यवृती देण्यात येऊ लागली.

# अकोल्याचे मान्सून पूर्व नियोजन उघड!



दुर्गा चौकात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. हे पाणी वाहून जाण्यासाठी नाल्या मोकळ्या करण्यासाठी मशीनचा वापर करण्यात येत आहे.



जीवघेणा प्रवास! खडकी–चांदूर मार्ग खड्ड्यांच्या विळख्यात; पावसाळ्यात प्रत्येक प्रवास ठरतोय धोकादायक.












जनता भाजी बाजारात पावसामुळे चिखलाचे आणि घाणीचे साम्राज्य पसरले असून ग्राहक व विक्रेत्यांना बाजारात ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



मोर्णा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन सुरक्षेच्या कारणास्तव रामसेतू वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. नागरिकांनी मोठ्या पुलाचा वापर करूनच ये-जा करावी, असे आवाहन केले आहे.



"उमरी रोडवरील सेंट्रल प्लाझा समोर नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्याने वाहतुकीवर परिणाम झाला असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे."




नाले तुंबले... रस्ते जलमय!
दुर्गा चौक ते जठारपेठ रोडदरम्यान नाल्यांमध्ये गाळ साचल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यावर. वाहनचालकांची कसरत, पादचाऱ्यांचे हाल

# अकोल्याच्या जुन्या बसस्थानक परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य

## वाहनचालक त्रस्त, प्रवाशांकडून तातडीने दुरुस्तीची जोरदार मागणी

प्रतिनिधी ३१जुलै

**अकोला :** शहरातील जुन्या बसस्थानक परिसरातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. सर्वत्र पडलेल्या खड्डयांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालक, पादचारी आणि प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.





अकोला शहरातील जुन्या बसस्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून पावसाच्या पाण्यामुळे हे खड्डे पूर्णपणे भरले आहेत. त्यामुळे रस्ता कुठे सपाट आहे आणि कुठे खड्डा आहे, याचा अंदाज वाहनचालकांना येत नाही. परिणामी दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. याच मार्गावरून दररोज हजारो प्रवासी, एसटी बस, खासगी वाहने आणि रिक्षांची मोठी वर्दळ असते. पादचाऱ्यांनाही चिखल आणि साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे. अनेक दिवसांपासून ही समस्या कायम असतानाही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

### बसस्थानकाची सुरक्षितता वाऱ्यावर

जुन्या बसस्थानकाला सुरक्षा भिंत नसल्यामुळे मोकाट जनावरे, कुत्रे आणि खासगी वाहनधारक सर्रास या भागातून ये-जा करतात. त्यामुळे एखाद्यावेळी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रात्रीच्यावेळी काही असामाजिक तत्त्व या परिसरात सक्रीय होत असल्याने मोठा धोका वाढला आहे. त्यामुळे या ठीकाणी सुरक्षा भींत व सुरक्षा रक्षक असणे गरजेचे असल्याचेही प्रवासी वर्गातून बोलल्या जात आहे.

## पातूर पोलिसांची मोठी कारवाई; अवैध गोवंश वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल



प्रतिनिधी ३१जुलै

**पातूर :** पातूर पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरीत्या गोवंश जनावरांची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई करत एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत तीन गोवंश जनावरे आणि बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ₹६.७० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून बोलेरो पिकअप (क्र. MH-30-AB-2891) ची तपासणी करण्यात आली. त्यावेळी वाहनामध्ये तीन गोवंश जनावरे क्रूरतेने कोंबून

### 3 जनावरे व बोलेरो वाहन जप्त

अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर पोलिसांनी वाहनासह जनावरे ताब्यात घेत कारवाई केली. या प्रकरणी शेख फय्याज शेख हय्यात (वय ३०, रा. मुजावरपुरा, ता. पातूर, जि. अकोला) तसेच वाहन मालक शेख वाजीद शेख राजिक (रा. मुजावरपुरा, ता. पातूर, जि. अकोला) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५ तसेच प्राणी संरक्षण अधिनियम, १९६० मधील कलम ५, ५अ, ५ब, ९ व ११(१)(ल) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेकापूर येथे मुसळधार पावसाचा तडाखा

# एक एकर सोयाबीन पीक व तारकुंपणाचे 16 सिमेंट पोल पुराच्या पाण्यात वाहून गेले



प्रतिनिधी ३१जुलै

**पातूर :** तालुक्यात रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेकापूर येथील शेतकरी प्रकाश जाधव यांच्या शेतातील सुमारे एक एकर सोयाबीन पीक तसेच शेताभोवती उभारलेले तारकुंपणाचे १६ सिमेंट खांब (पोल) पुराच्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेले.

अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आणि पुराच्या वेगवान प्रवाहामुळे सोयाबीन पीक पूर्णतः उद्ध्वस्त झाले. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, प्रशासनाने तातडीने पंचनामा करून शासनाकडून योग्य आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी प्रकाश जाधव यांनी केली आहे.

सततच्या पावसामुळे परिसरातील अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने इतर शेतकऱ्यांनाही नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महसूल व कृषी विभागाने त्वरित पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

## सिद्धार्थ नगरातील पूल कालबाह्य



प्रतिनिधी ३१जुलै

**हिवरखेड :** प्रभाग क्र ६ मध्ये येत असलेल्या लेंडिनाला पूल कालबाह्य झाल्याचे समजते हा छोटा फुल मोठा करावा, संध्या पावसाचे दिवस सुरू असून लेंडिला पूर येतो आणि प्रभाग ५, व ६ ची ही सीमा असल्याने नागरिकांना येथून दिवसभर ये जा करावी लागते.

सबंधित विभागे तत्काळ येथे काही उपाय योजना करावी अन्यथा नागरिकांना आदोलनाचे स्वरूप निर्माण करावे लागणार अशी परिस्थीती या मार्गावर नागरिकाच्या झालेल्या जमावंवरून समजते.

# पातूर–बाळापूर महामार्गावर झाड कोसळून वीजतारा तुटल्या

### मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी ३१जुलै

**पातूर :** आज सायंकाळी पातूर-बाळापूर महामार्गालगत असलेले एक मोठे झाड विद्युत तारांवर कोसळल्याने वीजतारा तुटून मोठी दुर्घटना घडली. तुटलेल्या विद्युत तारा रस्त्यालगत असलेल्या दुकानावर तसेच एका चारचाकी वाहनावर पडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे



वातावरण निर्माण झाले होते. झाडाच्या काही फांद्या विद्युत खांबावर तर काही फांद्या चारचाकी वाहनावर पडल्याने नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. वीजपुरवठा तातडीने खंडित करण्यात आला असून पुढील दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित विभागाने झाड हटविणे व तुटलेल्या विद्युत तारांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेतले.या घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. रस्त्यालगत धोकादायक स्थितीत असलेल्या झाडांची तातडीने पाहणी करून त्यांची छाटणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## नेर येथील करवाढीविरोधातील आंदोलन स्थगित

प्रतिनिधी ३१ जुलै

**नेर** : नगरपरिषदेने लागू केलेल्या वाढीव मालमत्ता करवाढीच्या अनुषंगाने संघर्ष समितीने ७ ऑगस्ट रोजी आंदोलन पुकारले होते.

मुख्याधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मालमत्ता करवाढ विरोध संघर्ष समिती, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय मुस्लीम मोर्चा आणि भारत मुक्ती मोर्चा यांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुख्याधिकाऱ्यांनी २७ जुलै रोजी संघर्ष समितीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी पाचारण केले. चर्चेदरम्यान नळ पुरवठ्याचे सप्टेंबरअखेरपर्यंत नियमित बिल वितरण, पाइपलाइन व व्हॉल्व्हच्या गळतीची दुरुस्ती, शुद्ध पाणीपुरवठा, वाढीव करासंदर्भातील नागरिकांचे आक्षेप अटीशिवाय स्वीकारावे या मागण्या मान्य केल्या. त्यामुळे ३१ जुलै रोजी प्रस्तावित महाविशाल रॅली, ७ऑगस्ट रोजीचा नेर बंद स्थगित केला. प्रशासनाने आश्वासनांची अंमलबजावणी न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघर्ष समितीने दिला. यावेळी प्रा. मनोहर देशमुख, अरुण राऊत, रजा शेख, सुकराज बनसोड, नवनाथ दरोई आणि शारिक खान, आदी उपस्थित होते.

# पुरात कार गेली वाहून: पती बचावला; पत्नीसह दोन मुली बेपत्ता






### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

▪ नदीपात्रातील पाण्याचा प्रचंड वेग आणि सतत कोसळणारा पाऊस यामुळे बचावकार्यात मोठी आव्हाने येत आहेत. दरम्यान, सोशल मीडियावर या दुर्घटनेबाबत विविध तर्क-वितर्क पसरत असल्याने, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच पूरपरिस्थितीत पुलांवरून धोकादायकरीत्या वाहने नेण्याचे टाळावे, अशी ताकीदही देण्यात आली आहे.

प्रतिनिधी ३१ जुलै

### एकाच कुटुंबावर काळाचा घाला

**यवतमाळ** : जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाल्यांना आलेल्या भीषण पुराचा अंदाज न आल्याने दारव्हा-आर्णी मार्गावरील दहेली (कुपटी) येथील पुलावर गुरुवारी मध्यरात्री एक अत्यंत हृदयद्रावक दुर्घटना घडली. पुराच्या प्रचंड प्रवाहात ईर्टिगा कार वाहून गेल्याने एकाच कुटुंबातील आई आणि दोन चिमुकल्या मुली बेपत्ता झाल्या आहेत. वाहनाचे चालक अविनाश खंडारे यांनी प्रसंगावधान राखून झाडाचा आधार घेतल्याने ते सुखरूप वाचले असून, बेपत्ता तिघांचा आपत्ती व्यवस्थापन पथकाकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

दारव्हा तालुक्यातील लोणी येथील रहिवासी अविनाश नामदेवराव खंडारे (४०) हे पत्नी माधवी आणि प्राची व साची या दोन मुलींसह राळेगाव येथे कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेले होते. तेथून नातेवाईकांना सोडण्यासाठी बोरीअरब येथे गेल्यानंतर, दारव्हा मार्गे लोणीकडे परतताना मध्यरात्रीच्या सुमारास दहेली येथील नदीच्या पुलावर पुराचे पाणी वेगाने वाहत होते.





पाण्याच्या खोलीचा व वेगाचा अंदाज चुकल्याने त्यांची कार पुलावरून जात असताना अचानक पाण्याच्या प्रवाहात ओढली गेली आणि काही क्षणांतच वाहून गेली.

कार वाहून जात असताना अविनाश खंडारे यांनी बाहेर पडत जवळील झाडाचा आसरा घेतला आणि स्वतःचा जीव वाचवला. मात्र, त्यांची पत्नी माधवी खंडारे (ज्या लोणी येथील आश्रमशाळेत मानधन तत्त्वावर शिक्षिका आहेत) आणि दोन लहान मुलींना कारमधून बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. घटनेची माहिती मिळताच महसूल, पोलीस प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

### पालकमंत्री संजय राठोड यांचे प्रशासनाला तात्काळ निर्देश

▪ दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी शुक्रवारी पहाटे तीनच्या सुमारास पोलीस आणि महसूल प्रशासनाशी संपर्क साधून शोधमोहीम अधिक तीव्र करण्याचे आदेश दिले. घटनास्थळी आवश्यक ते मनुष्यबळ, बोटी आणि यंत्रसामग्री तात्काळ उपलब्ध करून देऊन बचावकार्य गतीने राबवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## वृद्ध महिलेची कु-हाडीने निर्घृण हत्या; अ‍ॅट्रॉसिटीसह खुनाचा गुन्हा, आरोपी अटकेत

प्रतिनिधी ३१ जुलै





**उमरखेड** : पत्नीला वाममार्गाला लावत असल्याचा संशय मनात धरून ६० वर्षीय वृद्ध महिलेवर कुऱ्हाडीने सपासप वार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उमरखेड तालुक्यातील शांतीनगर (मुळावा) येथे घडली. या प्रकरणी पोफाळी पोलिसांनी खुनासह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रॉसिटी) गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

मृत महिलेचे नाव रुख्माबाई शंकर सरकुंडे (वय ६०) असे असून त्या शांतीनगर (मुळावा) येथे वास्तव्यास होत्या. तर अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गजानन खंडूजी डांगे (वय ४२) असे आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लक्ष्मण शंकर सरकुंडे (वय ४०, रा. खर्षी, ता. पुसद) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांची आई रुख्माबाई या धाकट्या मुलाकडे शांतीनगर येथे राहत होत्या. सन २०२५ मध्ये उसतोडीसाठी गेल्यानंतर आरोपी गजानन डांगे आणि त्याच्या पत्नीची रुख्माबाई यांच्याशी ओळख झाली होती. मात्र त्यानंतर आरोपी आपल्या पत्नीवर संशय घेऊ लागला आणि रुख्माबाई या आपल्या पत्नीला वाममार्गाला लावत असल्याचा आरोप करत त्यांच्याशी वारंवार वाद घालत तसेच धमक्या देत होता.

२३ जुलै रोजी रुख्माबाई या मुलगा लक्ष्मण याला भेटण्यासाठी खर्षी येथे गेल्या असताना त्यांनी आरोपीकडून होत असलेल्या त्रासाची माहिती दिली होती. त्यानंतर २९ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास लक्ष्मण सरकुंडे यांना त्यांच्या मामेभावाचा फोन आला. रुख्माबाई यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला झाल्याची माहिती मिळताच ते नातेवाईकांसह शांतीनगर येथे पोहोचले. तेव्हा रुख्माबाई या घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर कुऱ्हाडीचे गंभीर वार झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोफाळी पोलिस ठाण्यात आरोपी गजानन डांगे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेअंतर्गत खुनाचा गुन्हा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला तत्काळ अटक केली असून पुढील तपास प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते करीत आहेत. ही घटना परिसरात खळबळ उडवणारी ठरली असून संशयाच्या भरात घडलेल्या या निर्घृण हत्येमुळे शांतीनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## शेअर बाजार : साडेपाच लाखांची ऑनलाइन फसवणूक

प्रतिनिधी ३१ जुलै

**उमरखेड** : शेअर बाजारात मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका ६० वर्षीय वृद्धाची तब्बल ५ लाख ५० हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी अज्ञात सायबर भामट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

ब्राह्मणगाव (ता. उमरखेड) येथील शंकर रामराव करपे (वय ६०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २३ एप्रिल ते ९ जून २०२६ या कालावधीत ९८२०३५८३४७ या मोबाईल क्रमांकावरून अज्ञात व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधला. 'Avendus Capital Private Limited' या नावाच्या अ‍ॅपद्वारे शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास अल्पावधीत मोठा नफा मिळेल, असे सांगून आरोपीने त्यांचा विश्वास संपादन केला.

यानंतर विविध टप्प्यांत ऑनलाइन व्यवहार करण्यास सांगून आरोपीने फिर्यादींकडून ५ लाख ५० हजार रुपये जमा करून घेतले. सुरुवातीला नफ्याचे आश्वासन देण्यात आले; मात्र नंतर पैसे परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे करपे यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून अपराध क्रमांक ७०३/२०२६ नोंदविण्यात आला असून अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ६६(क) व ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस संबंधित मोबाईल क्रमांक, बँक व्यवहार आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहारांची साखळी तपासत असून आरोपीचा शोध सुरू आहे.

**पोलिसांचे आवाहन** : सायबर गुन्हेगार शेअर बाजार, गुंतवणूक आणि जास्त परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांना जाळ्यात ओढतात. त्यामुळे कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून पैसे गुंतवू नयेत. गुंतवणुकीपूर्वी संबंधित कंपनीची खातरजमा करावी. संशयास्पद व्यवहार झाल्यास तातडीने १९३० सायबर हेल्पलाईन किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



प्रतिनिधी ३१ जुलै

**घाटंजी** : सहारा फाउंडेशन, घाटंजीच्या वतीने तालुक्यातील राजेगाव, टिटवीपोड व बालाजीनगर पारधी बेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहारा फाउंडेशनचे अध्यक्ष कावेश शेख होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल तसेच अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सहारा फाउंडेशनचे अध्यक्ष कावेशभाऊ शेख, रफिक शेख, दत्ता खाटीक, प्रशांत मस्के, अविनाश भोयर, शाम गटलेवार, युवराज आडे, प्रकाश वावरे, गजानन माडवी, मोरेश्वर गेडाम, मेश्राम सर, अमोल नडपिलवार, सचिन गिनगुले, विक्की गेडाम, माणिक कोडापे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापकांनी सहारा फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक शिक्षक विकास चिखराम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना वेळेवर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकांनी सहारा फाउंडेशनचे आभार मानले.

## गुरुजनांप्रती कृतज्ञतेचा जागर

प्रतिनिधी ३१ जुलै




**महागाव** : येथील माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या सोहळ्याला पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शदानंद वेरूळकर, दत्तराव देशमुख उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे शदानंद वेरूळकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, "आपण घडवलेल्या विद्यार्थ्यांनी आज एवढी मोठी शैक्षणिक संस्था उभी केली, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. शिक्षक म्हणून आमचे जीवन सार्थकी लागल्याची भावना आज मनात निर्माण झाली आहे."

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पांडे, परवेज सुरैय्या, विशाल पांडे आणि केतकी पांडे यांनी विद्यार्थ्यांना गुरुचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. गुरुंच्या संस्कारातूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला हिना परवेज सुरैय्या, सागर पांडे, फिरोज पठाण, अमोल राजवाडे, प्राचार्या मंजू जोशी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर गुरुभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

## ई-केवायसीच्या तांत्रिक घोळात कर्जमाफी अडकली

प्रतिनिधी ३१ जुलै

**उमरखेड** : राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजनेची पहिली यादी जाहीर झाल्यानंतर उमरखेड तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. मात्र, ई-केवायसी प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे शेकडो शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. सेवा केंद्रांवर तासनतास थांबूनही प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने कर्जमाफी योजनेतील लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्रावर जाऊन ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परिणामी, तालुक्यातील सेवा केंद्रांवर मोठी गर्दी होत असून नेटवर्कच्या समस्येमुळे ई-केवायसीची प्रक्रिया वारंवार ठप्प होत आहे. अनेक शेतकरी दिवसभर प्रतीक्षा करूनही रिकाम्या हाताने परतत असल्याचे चित्र आहे.

सध्या तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने खरीप पिकांच्या मशागतीला वेग आला आहे. अशा परिस्थितीत शेतातील महत्त्वाची कामे बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सेवा केंद्रांवर हेलपाटे मारावे लागत आहेत. ई-केवायसीशिवाय कर्जमाफीचा लाभ मिळणार नसल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे.

या तांत्रिक अडचणींचा फटका बसलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी सहायक सहकार निबंधक कार्यालयात धाव घेत आपल्या अडचणी मांडल्या. शासनाने घातलेल्या जाचक अटी आणि तांत्रिक त्रुटींमुळे पात्र शेतकरीच लाभापासून वंचित राहत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ई-केवायसीची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी आता उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

## थकीत शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ द्या

### शेतकरी संघर्ष समितीची राज्य सरकारकडे मागणी

प्रतिनिधी ३१ जुलै



**पुसद** : राज्य शासनाच्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रसिद्ध झालेल्या लाभार्थी यादीचे स्वागत करतानाच, या योजनेतून वंचित राहिलेल्या उर्वरित थकीत कर्जदार शेतकऱ्यांनाही तातडीने कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने राज्य सरकारकडे केली आहे.

शेंबाळपिंपरी येथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेत आयोजित बैठकीत ही मागणी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष बबनराव देशमुख, सचिव, संचालक मंडळाचे सदस्य, शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष जैनुल सिद्दीकी यांनी यावेळी सांगितले की, कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांची थकीत कर्जे माफ झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे तसेच शेंबाळपिंपरी येथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे आभार मानले. मात्र, अनेक पात्र शेतकरी अद्याप या योजनेपासून वंचित असल्याने त्यांचाही समावेश करून सर्व थकीत कर्जदारांना न्याय देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीत कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थी यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी आधार कार्ड आणि कर्ज पासबुकसह सेतू सुविधा केंद्रात जाऊन ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ संचालक मनीषभाऊ देशमुख, साखरे, पत्रकार विजय चव्हाण, भाऊसाहेब देशमुख, संस्थेचे संचालक तसेच अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन उर्वरित थकीत कर्जदारांनाही तातडीने कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली.

## श्री स्वामी समर्थ केंद्रात महाआरोग्य शिबिर

प्रतिनिधी ३१ जुलै




**पुसद** : गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगर येथे रोटरी क्लब ऑफ पुसद, पांचभौतिक आयुर्वेद हॉस्पिटल आणि श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्धकर्म, अग्निकर्म व पंचकर्म महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात ८० हून अधिक रुग्णांची नाडी परीक्षण, उदर परीक्षण, पांचभौतिक चिकित्सा पद्धतीने आरोग्य तपासणी करण्यात आली. याशिवाय मोफत औषधोपचार तसेच विविध पंचकर्म उपचारही देण्यात आले.

पांचभौतिक आयुर्वेद हॉस्पिटलचे वैद्य डॉ. अमोल रमेश खांदवे यांनी रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून विद्धकर्म, अग्निकर्म, नस्य आदी उपचार केले. तसेच वेदनांपासून तात्काळ आराम मिळवून देणारे विविध पंचकर्म उपचार करण्यात आले. उपचारानंतर अनेक रुग्णांनी वेदना कमी झाल्याचा अनुभव व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अमोल खांदवे म्हणाले, "बदलती जीवनशैली, धावपळ आणि चुकीच्या आहारामुळे गुडघेदुखी, कंबरदुखी, मणक्याचे विकार, सांधेदुखी, आम्लपित्त आणि पचनसंस्थेशी संबंधित आजार वाढत आहेत. आयुर्वेद उपचारपद्धती केवळ लक्षणांवर नव्हे, तर रोगाच्या मूळ कारणावर उपचार करण्यावर भर देते. पांचभौतिक आयुर्वेदातील उपचार सुरक्षित, दुष्परिणामरहित आणि प्रभावी असल्याने नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा."

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगर, रोटरी क्लब ऑफ पुसद तसेच पांचभौतिक आयुर्वेद हॉस्पिटलच्या पदाधिकारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारा अन्यथा माझ्याशी गाठ

## आमदार प्रवीण पोटे पाटील यांचा अधिकाऱ्यांना कडक इशारा

प्रतिनिधी ३१ जुलै

अमरावती : दोन दिवसापूर्वी राजापेठ उड्डाणपुलावर घडलेल्या दुर्दैवी भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी पोलिस प्रशासन,मनपा अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता यांना सोबत घेऊन केली अपघातस्थळ राजापेठ उड्डाणपुलाची पाहणी केली.

शहरातील अपघातप्रवन स्थळे(ब्लॅक स्पॉट) निश्चित करून,गतिरोधक निर्धारित मानकानुसार असावे,गतिरोधकावर रंगीत पट्टे असावे,राजापेठ चौकात रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे त्वरित काढावी,तसेच बेशिस्तपणे रस्त्याच्या मधात ऑटोरिक्षा उभे करणाऱ्या चालकांना शिस्त लागावी यासाठी कार्यवाही करावी असे निर्देश आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. राजापेठ ते अंबादेवी रस्त्यावर प्रवेशद्वाराचे काम सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आल्याने मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा ताण वाढला असून अपघात होत असल्याचे उपस्थित नागरिकांनी आमदार प्रवीण पोटे पोटे यांच्या लक्षात आणून देताच आमदार प्रवीण पोटे यांनी अधिकाऱ्यांची



खरडपट्टी काढली,रस्ता पूर्णपणे बंद करणे मूर्खपणाचे असून किमान एकेरी वाहतूक सुरू ठेवून बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

वाहतूक पोलिस वाहतूक नियंत्रण करण्याऐवजी केवळ चालन फाडणे आणि अवैध वसुली यातच व्यस्त राहत असल्याचे नागरिकांनी सांगताच आमदार प्रवीण पोटे पोटे चांगलेच संतप्त झाले व वाहतूक अधिकाऱ्यांनी तात्काळ याची दखल घेऊन सुधारणा करावी अन्यथा आपण स्वतः रस्त्यावर उतरून आपल्या पद्धतीने अशा कामचुकार व भ्रष्ट कर्मचाऱ्यांना धडा शिकवू असा इशारा यावेळी प्रवीण पोटे पोटे पाटील यांनी दिला. शहरातील रस्ते मोकळे असावे,फुटपाथ वरून नागरिकांना चालता यावे तसेच अपघात मुक्त शहर व्हावे यासाठी मनपा,पोलिस प्रशासन,वाहतूक विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाने दर १५ दिवसांनी संयुक्त बैठक घेऊन धडक कृती आराखडा तयार करावा व त्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी अन्यथा आपण आपल्या पद्धतीने धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही आपल्यासाठी नागरिकांची सुरक्षितता महत्वाची असून या बाबतीत आपण कुणालाही माफ करणार नसल्याचा इशारा आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी यावेळी दिला. अपघात झाल्यावर त्या कुटुंबीयांवर जो कायमस्वरूपी आघात होतो त्याबद्दल संवेदनशीलता बाळगून सामुहिकपणे काम करणे गरजेचे असून अनावश्यक स्वागत द्वारे,कमानी, चबुतरे आदी उभारताना त्याची खरोखर आवश्यकता आहे का?त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो का?याची रीतसर तपासणी व्हावी, विना नंबर प्लेट फिरणाऱ्या वाहनांची जप्ती व्हावी अशा अनेक सूचना यावेळी आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी केल्या.१५ दिवसाचे आत सुधारणा न दिसल्यास आपण स्वतः रस्त्यावर उतरून प्रशासनाला वठणीवर आणू असे अभिवचन यावेळी आमदार प्रवीण पोटे पाटील पाटील यांनी उपस्थित नागरिकांना दिले. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी,मनपा सभागृह नेते चेतन गावंडे,प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी,तुषार भारतीय,जयंत डेहनकर,चेतन पवार,किरण पातूरकर,राजेश पड्डा,नगरसेवक ऋषिकेश देशमुख,संजय कटारिया,मनपा आयुक्त श्री गोंदवले,पोलिस उपायक्त घुगे, प्रांजली सोनवणे मॅडम,पोलिस निरीक्षक श्री गावंडे,पोलिस सह उपायुक्त खताले,पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण,मनपाचे उपायुक्त नरेंद्र वानखडे,मनपा कार्यकारी अभियंता रवींद्र पवार,उपअभियंता हंबर्डे,सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे,बाजार परवाना अधीक्षक मंगेश कडू, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गिरी साहब,उपभागीय अभियंता विनोद बोरसे आदी उपस्थित होते.

# छायाचित्रकारांना फोटोग्राफी व्यवसाय वाढीसाठी कार्यशाळेतुन माणसी ठक्कर यांनी दिली नवी दिशा

प्रतिनिधी ३१ जुलै

**अमरावती:** अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन च्या वतीने आयोजित एक दिवसीय फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेत मोठ्या प्रमाणात फोटोग्राफर बंधू भगिनी सहभागी झाले होते. मुंबई येथील सुप्रसिध्द मानसी ठक्कर यांनी फोटोग्राफी कार्यशाळेत मार्गदर्शन केले आपला फोटोग्राफी चा व्यवसाय कसा वाढेल त्याचबरोबर फोटोग्राफी व्यवसायाचा मार्केटिंग कस करायचं सोशल मीडियावर कसा उपयोग घ्याचा प्लॅटफॉर्म कसे उपलब्ध होतात. तसेच फोटोग्राफी संदर्भात आपला करारनामा कसा असला पाहिजे अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत ठक्कर मॅडम यांनी फोटोग्राफर बंधू भगिनी यांना मार्गदर्शन केले अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन च्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेला अमरावती जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील छायाचित्रकार बंधूंनी मोठा सहभाग घेतला होता छायाचित्रकारांना या कार्यशाळेत अनेक नवीन फोटोग्राफी मध्ये उपयोगात येणारे गोष्टी शिकायला मिळाल्या सर्वात जास्त व्यवसाय वाढवण्यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले तसेच यावेळी मानसी ठक्कर यांचे स्वागत असोसिएशनचे अध्यक्ष गजानन अंबाडकर, सचिव प्रशांत टाके, यांच्या हस्ते करण्यात



आले त्याचबरोबर या कार्यशाळेचे प्रकल्प प्रमुख प्रतिक रोहणकर व अनंत जामोदकर यांचे स्वागत व सन्मान मानसी ठक्कर यांच्या हस्ते करण्यात आला अमरावती शहरातील प्रसिद्ध, सुप्रसिद्ध फोटोग्राफर या कार्यशाळेला उपस्थिती होते. डिजिटेक कंपनीचे यामध्ये विशेष मोलाचे सहकार्य लाभले त्याच बरोबर पुणे येथील सुमित जैन यांचे विशेष सहकार्य लाभले मानसी ठक्कर यांच्या वतीने प्रश्न उत्तर करण्यात आले यावेळी सर्वात जास्त उत्तर प्रतिक रोहणकर, नंतर रूपेश फसाटे व आणखी दोन फोटोग्राफर बंधू यांनी दिले चौघांचा मानसी ठक्कर यांनी भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी सहभागी छायाचित्रकार यांना प्रमाणपत्र देण्यात आले कार्यशाळेच्या ठिकाणी नोंदणीसाठी अभिजित मेश्राम, स्वप्निल मनवर यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली यावेळी या कार्यशाळेच्या कार्यक्रमाला अमरावती शहरातील कॅनन कंपनी शोरूमचे समन्वयक शैलेश धिरडे उपस्थित होते. हॉटेल राई जिरा येथे कार्यशाळा झाली. व अखिलेश राठी यांचे विशेष सहकार्य लाभले या कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पडिया माजी अध्यक्ष यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी अंबानगरी चे अध्यक्ष ,सचिव, प्रकल्प प्रमुख व सर्व सदस्य, कार्यकारणी सदस्य ,संपूर्ण माजी पदाधिकारी, माजी अध्यक्ष, यांनी अथक परिश्रम घेऊन ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडली असोसिएशनच्या वतीने वर्षभर छायाचित्रकार बंधू-भगिनींसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे नागरीकांना च्या मागणी नुसार त्याकरिता ग्रामीण भागातील छायाचित्रकार हा आपला व्यवसाय कसा यशस्वी करण्यासाठी सक्षम झाला पाहिजे व तंत्रज्ञानुसार त्यांना अनेक गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी असोसिएशन कटिबंध आहे असे आव्हान अध्यक्ष व सचिव यांनी केले आहे मोठ्या प्रमाणात या कार्यशाळेला छायाचित्रकार बंधू भगिनी उपस्थित होते अंबानगरी फोट-व्हिडीओग्राफर्स असोसिएशन चे सदस्य व माजी अध्यक्ष या कार्यशाळेला उपस्थित होते.

# हत्या प्रकरणातील मृतक युवकाची ओळख पटली

प्रतिनिधी ३१ जुलै

**अमरावती :** पोलीस स्टेशन खोलापूर येथे दिनांक २९/७/२०२६ रोजी डायल ११२ वर कॉल आला की, धामोरी फाट्यावर एक इसम चाकू मारलेल्या अवस्थेत पालथा पडून आहे वरून घटनास्थळी पोलीस स्टेशन साना क्रमांक २९ जुलै रोजी २०. ४१ वा. रवाना होऊन घटनास्थळी भेट दिली असता घटनास्थळी इसम राहुल राजू रावेकर वय ३२ वर्ष रा. वाठोडा शुक्लेश्वर,ता. भातकुली जिल्हा अमरावती मृत अवस्थेत पाठीत चाकू खूपसलेला दिसून आला. वरून घटनास्थळी शासकीय पंच यांना बोलावून घटनास्थळ पंचनामा करण्यात आला आहे मृतक याची बॉडी पी .एम. करिता जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे पाठवण्यात आली आहे. गुरुवारी रोजी मृतक यांचे पी.एम . झाले असून सदर घटने संदर्भात पोलीस स्टेशन खोलापुर येथे अपराध क्रमांक १८१/ २६ कलम १०३(१) क्नठ्ठ्ह्य गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू असुन तपासामध्ये सहा संशयित व्यक्ती ताब्यात घेण्यात आली असून गुन्हा संबंधी सखोल विचारपूस सुरू आहे. याप्रकरणी ग्रामीण गुन्हे शाखा व खोलापूर पोलीस तपास करीत आहे.

# खरीप हंगामासाठी राज्यस्तरीय पीकस्पर्धा जाहीर

## शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी ३१ जुलै

**अमरावती :** कृषी विभागाने खरीप हंगाम २०२६ साठी राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे आयोजन केले आहे. यात मूग आणि उडीदसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, इतर पिकांसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. पिक स्पर्धेच्या माध्यमातून प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन राज्याच्या कृषी उत्पादकतेत वाढ करण्याचे उद्दिष्ट आहे. स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ प्रमुख पिकांचा समावेश आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटाला प्रति पीक ३०० रुपये तर आदिवासी गटाला १५० रुपये प्रवेश शुल्क आकारले जाईल. शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आणि ती तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. भात पिकासाठी किमान २० गुंठे आणि इतर पिकांसाठी ४० गुंठे क्षेत्रावर सलग लागवड असणे बंधनकारक आहे. ही स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित केली जाईल आणि विजेत्यांना राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर पहिले, दुसरे आणि तिसरे रोख बक्षिसे दिली जातील. तालुका पातळीवर ५ हजार रुपये, जिल्हा पातळीवर १० हजार रुपये, तर राज्य पातळीवर ५० हजार रुपयांचे पहिले बक्षीस मिळेल. इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, शुल्क भरल्याचे चलन, सातबारा उतारा, आदिवासी असल्यास जात प्रमाणपत्र, पिकाच्या क्षेत्राचा नकाशा आणि बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत या कागदपत्रासह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावरील पीक स्पर्धा नोंदणी येथे अर्ज करावा किंवा स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच शेतकऱ्यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# नवाथे चौक ते साईनगर चौक परिसरात प्लास्टिक जप्ती व हॉटेल वेस्ट तपासणी मोहीम



**अमरावती:** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त, झोन क्र. ४ यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. ३० जुलै) नवाथे चौक ते साईनगर चौक परिसरात प्लास्टिक जप्ती, डस्टबिन तपासणी आणि हॉटेल वेस्ट तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण १४ व्यावसायिक आस्थापनांची तसेच ७ मंगल कार्यालयांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी मंगल कार्यालयांना हॉटेल वेस्टची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच नियमांचे पालन करण्याबाबत संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या. स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सर्व संबंधितांनी महानगरपालिकेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले. या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, प्रसाद कुलकर्णी, सोपान माहुलकर, प्रियंका बैस, सागर राजुरकर, दिनेश निंधाने, वैभव खरड, सुमेध मेश्राम यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# प्रादेशिक परिवहन आरटीओ कार्यालयात 'नशामुक्ती जनजागृती अभियान-2026' उत्साहात

प्रतिनिधी ३१ जुलै

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार 'नशामुक्ती जनजागृती अभियान-२०२६' अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे नशामुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे उपस्थित होते. यावेळी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कांचन जाधव यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना नशामुक्तीची सामूहिक शपथ दिली. कार्यक्रमाला मोटार वाहन निरीक्षक, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच जनमान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमादरम्यान व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून कुटुंब, कार्यस्थळ आणि समाजामध्ये नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन



करण्यात आले. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून निरोगी, सुदृढ आणि जबाबदार समाजनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अनिल मानकर, जनसंपर्क अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांनी केले. या उपक्रमातून प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांनी शासनाच्या नशामुक्ती अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला.

# आषाढी एकादशी निमित्त गुरुपौर्णिमा कार्यक्रम रंगला

## विठू माऊलीच्या जागर मध्ये कलाकारांसह प्रेक्षक रंगले. - अविष्कार कला केंद्राचा उपक्रम

प्रतिनिधी ३१ जुलै

अमरावती - अविष्कार नृत्यकला केंद्र मुख्य शाखा बालाजी नगर च्या वतीने हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथील सोमेश्वर पुसदकर सभागृहात आषाढी एकादशी व गुरुपौर्णिमा निमित्ताने विठू माऊलीचा जागर व ग्रुप चा आदर करत कलाविष्कार कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन अविष्कार नृत्य शाखेच्या संचालिका तसेच सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना आदिती मेहता यांनी केले होते. कार्यक्रमाची सुरुवात माँ सरस्वती व नृत्य कलेचे दैवत नटराज यांच्या पूजनाने करण्यात आली. दीप प्रज्वलन सी.ए निलेश लाठीया,दीपक गुल्हाने ,डॉ. मिथिलेश राठोड,डॉ.वनिता मोहोड,आयुर्वेदाचार्य डॉ. माया बोरखडे , समाजसेविका कांता काळे, यांच्या हस्ते करण्यात आले . रुपाली ताई कुरेकर,व निर्माते विनोद तोंडगावकर यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. विठू नामाचा गजर करत गुरुमाऊलीचा जागर करणाऱ्या



विविध नृत्य कलेने संपूर्ण सभागृह भक्तिमय होऊन दणाणले होते .प्रत्येक भक्तिमय नृत्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ,टाळ्यांचा कडकडाट मिळत होता. अगदी लहान वयापासून कथक कलेचे ज्ञान मिळवत विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या अदिती मेहता यांनी कथक ही कला साता समुद्रा पार नेऊन टाकण्याचा त्यांचा मानस बोलतांना सांगितला. कार्यक्रमाची सुरुवात शांभवी,आरणा, त्रिशा या विद्यार्थिनीने व देवा श्री गणेशा(सृष्टी बोरखडे यांनी गणेश वंदना सादर करून केली.यानंतर गुरुवंदना लाभिका, ओवी, चौधरी समूह नृत्य, अभंग – श्रीरंगा विठ्ठला सलीला जोशी, अभया जोशी,बघ उघडूनी दार तनवी, आरोही, सौम्या, राजवी, स्वरा, मार्गशी ,"सुंदर ते ध्यान एकता, गुरुपौर्णिमा स्पेशल विधीता, मंजिरी, सावी, देवीचा गोंधळ,विश्वंभरी वंदना ओजस्वी, यद्नी जय जय विठ्ठल श्रीहरी विठ्ठल पांडुरंगा गोविंदा खेळ मांडीयेला,देव विठुराया, विठ्ठल माझा सोबती सौम्या, आरोही, तनवी मार्गशी देशमुख,हेचि दान देगा देवा रखुमाई गजर माऊलीचा,

विठूचा गजर अधिरा, ओवी, मंजिरी, आराध्या, श्रीनिका,माऊली माऊली कॉपर प्लेट नृत्यानंतर अबीर गुलाल या नृत्याचे मनमोहक सादरीकरण अदिती मेहता यांनी केले. श्रीजा तोंडगावकर हिने रुक्मिणी तर सोहम लोमटे यांनी विठ्ठलाची आकर्षक अशी वेशभूषा केली होती. यावेळी नृत्यकलेत प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींना कै. राजाभाई केशवराव जोशी व कै. वसुधा राजाभाई जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रोत्साहनपर बक्षिसे प्रथम वर्ष ह्मस्वरा केरके, द्वितीय वर्ष आरणा दाखणे, तृतीय वर्ष तन्वी भांबूरकर आंतरराष्ट्रीय स्पर्धा विजेती मार्गशी देशमुख या विद्यार्थ्यांना देण्यात आले. कथक परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या अविष्कार कला केंद्र बालाजी नगर च्या कथक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या मेरिट प्राप्त विद्यार्थिनी स्वरा केरके, ओजस्वी देशमुख,मार्गशी धोटे, कनक ठाकरे, जिज्ञासा पेठे, आरना दखने, देवांशी तारोणे, तन्वी भांबुरकर,मंजिरी सावरकर, मंजिरी मोरे,अनुजा भांबुरकर, विधिता देशमुख.फर्स्ट क्लास प्राप्त विद्यार्थिनी मुदिता दांडगे,मुक्ता देशमुख, स्वरा खांडे, याद्री बनारसे, एंजल ढवळे, सलीला जोशी, शिवप्रिया मालपाणी या विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सुमधुर संचालन व आभार पत्रकार कंचन मूरके यांनी केले. कार्यक्रमात रुपाली कुर्हेकर ,ज्योती लोमटे.,प्रगती कडू,मनीष देशमुख,वीरेंद्र सिंग ठाकूर,सुरेखा व अभय मेहता यांसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुकेश राऊत. सौरभ तोंडगावकर,रूपाली कुरेकर, राधा ठाकरे, मीनाक्षी पाचपोर, प्रियंका देशमुख, ज्योती लोमटे, पल्लवी भांबुरकर, रोहिणी पाटील, जयश्री लांडे, प्राची जोशी ,रोशनी सावरकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३१ जुलै

अमरावती : पोलीस स्टेशन मोर्शी येथे अपराध क ४५५/२६ कलम १०८,३(५) बी. एन. एस प्रमाणे दाखल गुन्हातील आरोपी कैलास कमलकिशोर सारडा रा. चांदुर बाजार जि. अमरावती,. नवनीत उर्फ नितु चांडक रा. चांदुर बाजार ह.मु. कठोरा रोड अमरावती, घनश्याम गठानी रा. मोर्शी जि. अमरावती यांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असुन ते प्रथमस्वरूपी सावकारी करतात अशी माहीत मिळुन येत आहे.

पोलीस स्टेशन मोर्शी जि. अमरावती ग्रामीण येथे दाखल गुन्हयातील तपासादरम्याण मयत पवन विद्यासागर भाकरे, रा. तरोडा डोमक ता. मोर्शी, जि. अमरावती यांनी लिहुन ठेवलेल्या चिठ्ठीतील मजकुर व इतर पुराव्यांच्या आधारे वरील नमुद आरोपीतांविरूध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

जर कोणत्याही नागरीकांनची वरील व्यक्तींनी शेती लिहुन घेतली असेल अथवा व्याजाने पैसे देवुन अधिक व्याज वसुल केले असेल तसेच इतर मालमत्ता लिहुन घेतली असेल किंवा कोरा चेक, कोरा स्टॅम्पवर सही घेतली असेल. तसेच नमुद आरोपीतांनी कोणत्याही व्यक्तींची आर्थिक फसवणुक केली असेल किंवा, बेकायदेशीर पैशांची मागणी केली असेल असे बेकायदेशीर कृत्य कोणत्याही नागरीकांविरूध्द झाले असेल, तर अशा नागरिकांनी तात्काळ पोलीस स्टेशन मोर्शी येथे निर्भयपणे प्रत्यक्ष उपस्थित राहुन अथवा दुरध्वनीद्वारे / ऑनलाईन तकार तात्काळ द्यावी. असे आवाहन पोलिसांनी जनतेस केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




## पोकराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...

# अधिकारी चतूर, चौकशी थातूर-मातूर !

## मुळमुद्दे चौकशीतून दूर, एसआयटीमार्फत चौकशी करण्याचा सूर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जागतिक बँकेच्या सहकार्याने राबवण्यात येणाऱ्या पोकरा योजनेचा उद्देश शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा आहे. मात्र वाशिम जिल्ह्यात पोकरा भाग एक योजनेत मोठा घोटाळा झाल्याची तक्रार एका शेतकऱ्याने थेट राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे केली होती. परंतु या प्रकरणात क्षेत्रीय कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचेच हात ओले झाल्यामुळे चौकशी थातुरमातुर करून मूळ मुद्द्याला बगल देण्यात आली आहे. तक्रारकर्त्या शेतकऱ्याने लिखित अर्ज दाखल करून चौकशी अहवाल प्राप्त केल्यानंतर या थातुरमातुर चौकशीचे बिंग फुटले आहे. उपविभागीय कृषी कार्यालयाच्या या लज्जास्पद कारभाराची विशेष चौकशी पथक ( एसआयटी ) मार्फत पुन्हा चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरत आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार वाशिम जिल्ह्यातील पोकरा - १ या योजनेत झालेल्या प्रचंड घोटाळ्याची तक्रार एका शेतकऱ्याने थेट राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे केली होती. ३३ पानांच्या या तक्रारीत भ्रष्टाचाराच्या सर्व मुद्द्याचे पुरावे जोडण्यात आले होते. मात्र उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी मर्जीतल्या एका चतुर अधिकाऱ्यांमार्फत थातुरमातुर चौकशी करुन पोकरा भाग एक योजनेतील भ्रष्टाचाराचे पाप झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न चौकशी अहवाल समोर आल्यानंतर उघड झाले आहे. सदर चौकशी अहवाल आणि तक्रारीत करण्यात आलेले मुद्दे यातील विसंगती व कृषी सहसंचालक अमरावती यांनी दिलेला आदेश या सर्व प्रकरणाची पुन्हा विशेष चौकशी पथक ( एसआयटी ) नेमून चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकायुक्त कार्यालयाकडे करण्यात येणार असल्याची माहिती तक्रारदार यांनी दिली आहे.

सदर तक्रारीत नमूद करण्यात आले होते की, पोकरा योजनेतील सर्व नियम व निकष डावलून क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात अनागोंदी केली आहे. एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान देत शेलुखडसे येथील ऐंशी टक्के शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. यात अनेक शेतकऱ्यांनी सिंचन विहिरीसाठी अर्ज दाखल केले होते. त्यातील एका शेतकऱ्याला पूर्व संमती देऊनही केवळ आर्थिक लाभासाठी सदर शेतकऱ्याला सिंचन विहीर योजनेपासून वंचित ठेवण्यात आले आहे. याबाबत सुद्धा सबंधित शेतकऱ्याने कृषी सहसंचालक अमरावती व राज्याच्या वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल केली होती. मात्र या तक्रारीला सुद्धा हेतुपुरस्पर डावलून या गंभीर प्रकरणावर झाकण टाकण्यात आले असल्याचे आता स्पष्ट होत आहे. पात्र निकष नसतांनाही सिंचन विहीर, एकाच व्यक्तीच्या नावावर एकाच घटकाचे डबल अनुदान देणे हा शेतकऱ्यांसाठी असलेल्या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी खुप मोठा कलंक आहे. शिवाय या योजनेतून वितरीत करण्यात आलेले नेटशेड, औजारे बँक, फळबाग लागवड आदींची सखोल चौकशी केली तर केवळ एका रिसोड तालुक्यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार उघड होऊ शकतो. मात्र कृषी सहाय्यक, सुपारवायझार पासून थेट जिल्हा कृषी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचेच हात भ्रष्टाचाराने बरबटले असल्याचे या चौकशी अहवालातून प्रकर्षाने जाणवत आहे. मात्र शेतकऱ्यांची दिशाभूल करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची व सबंधित अधिकाऱ्यांची कसून चौकशी करावी अशी राज्याच्या वरिष्ठ स्तरावर मागणी करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. अन्यथा तक्रारदार न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## थोडक्यात

### नगरपरिषदेचा 'एक पेड' माँ के नाम उपक्रम



### मानोरा रोडवरील हिंदू शमशानभूमीत ३०० वृक्ष लागवडीचा संकल्प

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत तसेच 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाअंतर्गत नगर परिषद मंगरूळपीर च्या वतीने मानोरा रोडवरील हिंदू शमशानभूमी परिसरात दि. २७ भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी शहरात ३०० वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन व संरक्षण करण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन वाशिम–मंगरूळपीर मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अशोक परळीकर होते. यावेळी नगरपरिषदेचे सभापती, गटनेते, नगरसेवक तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपनगराध्यक्ष तथा स्वच्छता विषयक आरोग्य रक्षण व वैद्यकीय समितीचे सभापती अनिल गावंडे यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली. 'झाडे लावा – झाडे जगवा' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देत शहर अधिक हरित, स्वच्छ व पर्यावरणपूरक करण्यासाठी वृक्षलागवडीसोबत त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमात कार्यालय अधीक्षक शेखर चव्हाण, स्वच्छता निरीक्षक गजानन तिडके, स्नेहल चव्हाण, सुरज संगत, आकाश चरावंडे, सुनिल शृंगारे, आनंद क्षीरसागर, आकाश लबडे तसेच स्वच्छता विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## वडील जीवंत, माणुसकीचा अंत , मृत दाखवितांना वाटली नाही खंत !

### *महसूल मंत्र्याचे जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश *खोटी माहिती सादर करणाऱ्या वर होणार गुन्हा दाखल

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

विशेष अभय योजना २०२५ अंतर्गत वारस अर्जदार संदीप लीलाराम पंजवाणी यांनी वडील लीलाराम ब्रिजलाल पंजवाणी हे जिवंत असताना मयत दाखवून मोजे कारंजा (लाड) येथील नझुल शीट नंबर १० डी प्लॉट नंबर ६१ भूखंड नियमाकुल करणे बाबत प्रस्ताव कारंजा-मानोरा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांच्याकडे सादर केल्यानंतर त्या प्रस्तावास उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, सहायक महसूल अधिकारी प्रस्तुतकार-१ प्रवीण चव्हाण यांनी प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्राची तपासणी न करता ढोबळमनाने नियमाकुल करणे बाबतचा आदेश पारित केला होता.त्याबाबतची तक्रार तथा निवेदन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख तथा कारंजा तालुका अध्यक्ष यांनी दि.०४ मे २०२६ जिल्हाधिकारी वाशिम यांना केल्यानंतर त्यांनी कोणत्याही प्रकारची नियमानुसार कारवाई केली नाही.



जिल्हाधिकारी वाशिम यांनी दिलेल्या तक्रारीची कोणत्याही प्रकारे दखल न घेतल्यामुळे विलास राऊत यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे १४ मे २०२६ ला तक्रार सादर केली. दिलेल्या निवेदनाची महसूल मंत्री यांनी तात्काळ दखल घेऊन जिल्हाधिकारी वाशिम यांना तात्काळ तपासून नियमानुसार उचित कारवाई करण्यास आदेश दिले.त्यानंतर तक्रारकर्ते विलास राऊत यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांची तीन वेळा कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन महसूल मंत्री यांनी दिलेल्या लेखी आदेशानुसार कारवाई करण्यास विनंती केली. जिल्हाधिकारी वाशिम यांनी महसूल मंत्री यांच्या लेखी आदेशानुसार कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

त्यामुळे राऊत यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंगळवार दिनांक २१ जुलै २०२६ रोजी त्यांच्या शासकीय चित्रकूट या निवासस्थानी त्यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा लघुउद्योग महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या नेतृत्वात युवक प्रदेशाध्यक्ष अमित सोनवणे, प्रदेश संघटक कपिल लिंगायत यांच्या प्रमुख उपस्थितीत भेट घेऊन विलास राऊत यांनी दुसऱ्यांदा निवेदन सादर केले व महसूल मंत्री यांना अवगत केले की जिल्हाधिकारी वाशिम यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई न केल्यामुळे विलास राऊत १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ०७.०० वाजता पासून उपविभागीय अधिकारी कार्यालय कारंजा (लाड) जि.वाशिम यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्यात येईल असे निवेदनात नमूद केले

## प्रियकराच्या मदतीने... पत्नीने केली पतीची हत्या !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात वाकळवाडी येथे ३१ जुलै रोजी उघडकीस आला आहे. पती हा आपल्या अनैतिक प्रेमातील सर्वात मोठा 'काटा' बनत आहे, हे पाहून पत्नीनेच स्वतःच्या प्रियकराच्या मदतीने पतीला दारू पाजून आणि दोरीने गळा आवळून त्याची निर्घृण हत्या केली,

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक सुरेश राजाराम झळके (वय ३०, रा. अमानी, ता. मालेगाव) हा तरुण गेल्या चार-पाच दिवसांपासून वाकळवाडी येथील आपल्या सासुरवाडीला गेला होता. ३० जुलै रोजी वाकळवाडी शिवारातील सुनील चोंडकर यांच्या शेतात सुरेश याचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच मालेगाव पोलिस स्टेशन चे ठाणेदार राजेश खेरडे आणि थ्थॅ प्रमुख सुधाकर आढे यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

मृतक सुरेश याच्या मृत्यूबाबत संशय बळावल्याने मालेगाव पोलिसांनी त्याची पत्नी आशा सुरेश झळके आणि तिचा प्रियकर महादेव बजरंग अंभोरे (वय २५, रा. पूर, ता. मंगरुळनाथ) या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली. पोलिसांनी आपल्या खास शैलीत विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धोत्रे, पोलीस उपनिरीक्षक गोखले, पोलीस हेड कॉन्स्टेबल गजानन झगरे, आशिष बिडवे, ज्ञानदेव मात्रे, पोलीस अंमलदार अमोल इरतकर आणि चालक सुनील तायडे यांच्या पथकाने केली.

## जिल्हाधिकारी साहेब, सोशल मीडियावर संदेश नव्हे; पूरग्रस्त गावांत अधिकारी-कर्मचारी तैनात करा !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

### प्रत्यक्ष यंत्रणा गावात पोहोचल्यास नागरिकांना मिळेल तातडीची मदत

वाशिम जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देत जिल्हा प्रशासनाने सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांना सतर्कतेच्या सूचना जारी केल्या आहेत. मात्र, केवळ संदेश फॉरवर्ड करून जबाबदारी संपत नाही. संभाव्य पूरग्रस्त गावांमध्ये महसूल, ग्रामपंचायत, आरोग्य, पोलीस व इतर संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी प्रत्यक्ष तैनात करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीची मदत मिळेल, प्रशासनाशी थेट संपर्क साधता येईल आणि मदत व बचावकार्य अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.



आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, नियंत्रण कक्ष, मंत्रालय मुंबई तसेच भारतीय हवामान विभागाच्या सूचनेनुसार ३१ जुलै २०२६ रोजी वाशिम जिल्ह्यातील कारंजा, मंगरूळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड आणि वाशिम तालुक्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, नदी-नाले, ओढे, धरण परिसर व पूरप्रवण भागात जाणे टाळावे, पाण्याखाली गेलेले रस्ते किंवा पूल ओलांडू नयेत तसेच विजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी थांबावे, अशा सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांनीही हवामान सुरक्षित झाल्यानंतरच शेतीची कामे करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, सोशल मीडियावरील सूचना महत्त्वाच्या असल्या तरी प्रत्यक्ष पूरस्थिती निर्माण झालेल्या गावांमध्ये अधिकारी व कर्मचारी उपस्थित असणे अधिक आवश्यक आहे. अशा वेळी नागरिकांना प्रशासनाशी त्वरित संपर्क साधता येतो, परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन तातडीने निर्णय घेता येतात आणि मदतकार्याला गती मिळते. केवळ ऑनलाइन सूचना देण्यापेक्षा गावागावांत प्रशासनाची उपस्थिती नागरिकांना अधिक दिलासा देणारी ठरते.जिल्हा प्रशासनाने सर्व यंत्रणांना सतर्कतेच्या सूचना दिल्या असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्ष (०७२५२-२३४२३८) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी संभाव्य पूरग्रस्त गावांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष तैनाती करून नागरिकांना तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## केनवड येथेच अप्परतहसील कार्यालय कायम ठेवा !

### अन्यथा आम्हीही तीव्र आंदोलन छेडू – सरपंच गणेशराव जुनघरे (अंचळ)

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

केनवड येथे सुरू असलेल्या अप्पर तहसील कार्यालयाच्या मागणीसाठीच्या साखळी उपोषणाला अंचळ ग्रामपंचायतीने जाहीर पाठिंबा दिला असून, 'प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवावे; अन्यथा अंचळ ग्रामस्थही तीव्र आंदोलनात सहभागी होतील,' असा इशारा अंचळचे सरपंच गणेशराव जुनघरे यांनी शासनाला दिला आहे. जनहिताच्या या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाची व्याप्ती आणखी वाढेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी सातत्याने केली आहे. केनवड हे परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असून येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, शिक्षण संस्था, राष्ट्रीयीकृत बँका, मोठी बाजारपेठ, बसस्थानक, राष्ट्रीय महामार्ग, विद्युत उपकेंद्र तसेच विविध शासकीय सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे अप्पर तहसील कार्यालयासाठी केनवड हाच सर्वाधिक सक्षम व सोयीचा पर्याय असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

अप्पर तहसील कार्यालय अन्यत्र हलविल्यास हजारो नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व महिलांना महसुली कामांसाठी वारंवार दूरचा प्रवास करावा लागेल.

त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होणार असल्याने शासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता केवळ जनहित, भौगोलिक गरज आणि उपलब्ध सुविधांचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, केनवड येथे सुरू असलेल्या साखळी उपोषणाला नागरिकांसह शेतकरी, व्यापारी, महिला,




युवती आणि विविध सामाजिक संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आज (शुक्रवारी) सकाळी उपोषणाचा तिसरा दिवस सुरू झाला असून आंदोलनाला दिवसेंदिवस अधिक बळ मिळत आहे. अंचळ ग्रामपंचायतीनेही या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

## शिक्षणात भारत आणण्यास विद्या भारती कटिबद्ध -प्रा.दिलीप जोशी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### शाळा संपर्क अभियानास उत्साहात प्रारंभ

अकोला, दि. २९ जुलै : गुरु पौर्णिमेच्या पावन पर्वाचे औचित्य साधून विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान संलग्न विद्या भारती विदर्भ, अकोला जिल्ह्याच्या वतीने आयोजित 'शाळा संपर्क अभियान' आज भारत विद्यालय, जठारपेठ, अकोला येथून उत्साहात प्रारंभ करण्यात आला. या अभियानांतर्गत आगामी महिनाभर जिल्ह्यातील विविध शाळांना भेटी देऊन विद्या भारतीच्या अखिल भारतीय शैक्षणिक कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्या भारती विदर्भचे प्रांत सहमंत्री, प्रख्यात वक्ते,



लेखक व विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी (वाशिम) उपस्थित होते. आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात त्यांनी विद्या भारतीच्या देशव्यापी शैक्षणिक कार्याचा परिचय करून देताना सांगितले की, 'भारतीय संस्कृती, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि राष्ट्रभावनेवर आधारित शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी विद्या भारती कटिबद्ध असून शिक्षणात भारत आणण्याचे कार्य संस्था सातत्याने करीत आहे.'

यावेळी त्यांनी आगामी २५ सप्टेंबर रोजी आयोजित 'वंदे मातरम' सामूहिक गीतगायनाचा जागतिक विक्रम, संत रविदास महाराज यांच्या ६५० व्या प्रकाशपर्वानिमित्त होणारे उपक्रम तसेच संस्कृती ज्ञान परियोजनेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.या प्रारंभ समारंभास विद्या भारतीचे प्रांत सहमंत्री समीर थोडगे, जिल्हा मंत्री गिरीश कानडे, अकोला महानगर अध्यक्ष मंगेश वानखडे, कार्यकारिणी सदस्य अमृतेश अग्रवाल, भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय घोगरे तसेच विद्या भारती महानगर मंत्री व भारत विद्यालयाचे उपमुख्याध्यापक योगेश मल्लेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमास शिक्षकवृंद, विद्या भारतीचे कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजापर्यंत विद्या भारतीच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभिमान जागविणाऱ्या कार्याचा व्यापक परिचय करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शाळा संपर्क अभियानास उपस्थितांनी शुभेच्छा देत अभियानाच्या यशस्वी वाटचालीबद्दल विश्वास व्यक्त केला.

# ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी बेमुदत आमरण उपोषण

प्रतिनिधी ३१ जुलै

**खामगाव:** तालुक्यातील गवंढाळा ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार, विकासकामांतील अनियमितता व प्रशासनातील पारदर्शकतेच्या मागणीसाठी गवंढाळा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आजपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. या उपोषणाचे नेतृत्व गोपाल सतीष पांढरे आणि महेंद्र रमेश पाटील यांनी केले असून, "जनतेचा पैसा जनतेसाठी, हिशेब




द्यावाच लागेल" अशी ठाम भूमिका उपोषणकर्त्यांनी मांडली आहे.

उपोषणकर्त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, ग्रामपंचायतीतील सर्व विकासकामे, आर्थिक व्यवहार व खर्चाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत मागविलेली माहिती वेळेत न देणाऱ्या संबंधित अधिकारी व प्रथम अपील प्राधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.याशिवाय, संबंधित ग्रामसेवकांच्या कामकाजाची चौकशी करून दोषी आढळल्यास सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई करावी, ग्रामपंचायतीचे सर्व आर्थिक व्यवहार, विकासकामे, मोजमाप पुस्तके (एम.बी.), बिले, व्हाउचर्स व इतर अभिलेख जनतेसाठी सार्वजनिक करावेत, तसेच चौकशी पूर्ण करून दोषींवर तात्काळ प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करून त्याचा अहवाल जाहीर करावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.हे उपोषण २९ जुलै २०२६ रोजी सकाळी १२ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, गवंढाळा येथे सुरू झाले असून, "जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत बेमुदत आमरण उपोषण सुरू राहील," असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. दरम्यान, या आंदोलनामुळे परिसरात लक्ष वेधले गेले असून, संबंधित प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांची खामगावात बँक व्यवस्थापकांना मारहाण

## सेंट्रल बँकेच्या खामगाव शाखेतील प्रकार

प्रतिनिधी ३१ जुलै

**खामगाव :** कर्जमाफी योजनेत त्यांच्या वडिलांच्या खात्याचा समावेश का झाला नाही, याचा जाब विचारण्यासाठी आलेले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल टिकार पाटील यांनी गुरुवारी दुपारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, खामगाव शाखेत थेट शाखा व्यवस्थापकां च्या दालनात घुसून मारहाण केली. यावेळी शाखा व्यवस्थापकांसह एका कर्मचाऱ्याला शिवीगाळ करणे, मारहाण करणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनुसार, गुरुवारी दुपारी सुमारे २:२० वाजता शाखा व्यवस्थापक शिवाजी कड हे त्यांच्या दालनात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे अधिकृत बैठकीत सहभागी होत कार्यालयीन कामकाज करीत होते. त्यावेळी स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अमोल विश्वासराव टिकार (रा. बोरी अडगाव, ता. खामगाव) हे बँकेत आले. त्यांच्या वडिलांचे खाते कर्जमाफीच्या यादीत का समाविष्ट झाले नाही, याबाबत लेखी माहिती देण्याची त्यांनी मागणी केली. त्यावर शाखा व्यवस्थापकांनी कर्जमाफीच्या लाभार्थ्यांची यादी शासनाकडून प्राप्त होत असल्याचे स्पष्ट केले, तसेच संबंधित बाबींची माहिती घेण्यासाठी बँकेच्या कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला आणि आपण व्हिडिओ कॉन्फरन्स मधील बैठकीत व्यस्त असल्याचे सांगितले; मात्र या उत्तरा मुळे संतप्त झालेल्या आरोपीने थेट व्यवस्थापकां च्या दालनात प्रवेश केला. त्यानंतर शाखा व्यवस्थापक शिवाजी कड तसेच कर्मचारी योगेश विजय भुतेकर यांच्याशी वाद घालत मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकारामुळे बँकेतील कामकाज काहीकाळ विस्कळीत झाले असून, शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शाखा व्यवस्थापक शिवाजी तुकाराम कड (४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल विश्वासराव टिकार (३५) यांच्याविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३२, ११५ (२), ३५१ (२) व ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### सोशल मीडियावर घटनेचा व्हिडिओ व्हायरल

घटनेदरम्यान उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी हा प्रकार मोबाइलमध्ये चित्रित केल्याचे सांगितले जात असून, संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये बँकेतील वाद आणि त्यानंतरची धावपळ दिसत असल्याचा दावा केला जात आहे.

# शेगावात बालकामगार आढळले; दोन गॅरेज मालकांवर गुन्हा दाखल

## कामगार विभागाच्या तपासणीत प्रकार उघड

प्रतिनिधी ३१ जुलै

**शेगांव:** शहरातील खामगाव रोडवरील दोन गॅरेजमध्ये अल्पवयीन मुलांकडून काम करून घेत असल्याचे कामगार विभागाच्या कारवाईत उघड झाल्यानंतर संबंधित दोन गॅरेज मालकांविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामगार विभागाच्या पथकाने २८ जुलै रोजी दुपारी ३:१५ वाजता भारत पेट्रोल पंपासमोरील खामगाव रोड परिसरात छापा टाकला. ही कारवाई दुकाने निरीक्षक दिपाली अडावतकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पहिल्या कारवाईत महाराष्ट्र स्प्रिंग पार्टस अँड वेल्डिंग वर्क्स या दुकानात एक अल्पवयीन मुलगा काम करताना आढळून आला. याप्रकरणी दुकानमालक शेख वसीम शेख करीम (रा. इदगाह प्लॉट, शेगाव) याच्याविरुद्ध शेगाव शहर

पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्याच परिसरातील इंडियन मोटर गॅरेज येथेही अल्पवयीन मुलाकडून काम करून घेत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी दुकानमालक मोहम्मद वसीम मोहम्मद शफीक (रा. बाजार फैल, शेगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहिता तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# बहापुरा येथे तरुणीची आत्महत्या

## मलकापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद

प्रतिनिधी ३१ जुलै

**मलकापूर:** तालुक्यातील बहापुरा येथे २१ वर्षीय तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी (दि. २९) दुपारी घडली. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

मृत तरुणीचे नाव सुजाता वामन इंगळे (२१, रा. बहापुरा, ता. मलकापूर) असे आहे. याप्रकरणी तिचा चुलत भाऊ रूपेश आत्माराम इंगळे यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांच्या माहितीनुसार,

दि. २९ जुलै रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास सुजाता इंगळे हिने घराच्या मागील खोलीतील लोखंडी पाइपला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास येताच नातेवाइकांनी तातडीने तिला खाली उतरवून उपचारासाठी मलकापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले.फिर्यादीनुसार, या घटनेबाबत कोणावरही संशय व्यक्त करण्यात आलेला नाही. याप्रकरणी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस अंमलदार सचिन पाटील करीत आहेत.

# जळगाव जामोद-वरवट बसफेऱ्या वाढविण्याची पालकांची मागणी

## परिसरातील नागरिकांचे आगार प्रमुखांना निवेदन

प्रतिनिधी ३१ जुलै

**जळगाव जामोद:** जळगाव जामोद वरवट (बकाल) मार्गावरील बसफेऱ्यांची संख्या वाढवून विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. यासंदर्भात राज्य महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळाच्या जळगाव जामोद आगाराचे प्रमुख मुकुंद नावकर यांना गुरुवारी निवेदन देण्यात आले. वरवट (बकाल), संग्रामपूर, निवाणा, चांगेफळ, खेर्डा (बु) आणि खेर्डा (खु.) परिसरातील शेकडो विद्यार्थी शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी दररोज जळगाव जामोद येथे ये-जा करतात. या मार्गावरील खेर्डा (बु) हे प्रमुख गाव असून, परिसरातील मोठ्या संख्येने विद्यार्थी येथून बसने प्रवास करतात; मात्र विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता सध्याच्या बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अक्षय पाटीला यांच्या नेतृत्वात पालक व नागरिकांच्या शिष्टमंडळाने आगार प्रमुख मुकुंद नावकर यांची भेट घेऊन बसफेऱ्या वाढविण्याची मागणी केली. यावेळी शिवदास खिरोडकर, अनिलसिंह राजपूत अजय गिरी, जितेंद्र चाहेल, वैभव जाणे, आकाश आटोळे, अमोल बहादरे, संतोष गनगे, सागर गवई, गजानन व्यवहारे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक वा नागरिक उपस्थित होते. सायंकाळी बसफेऱ्यांची संख्या अत्यल्प शाळा व महाविद्यालये सुटल्यानंतर सायंकाळी ५ ते ६ यावेळेत वरवट (बकाल) कडे जाणाऱ्या बसफेऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याने विद्यार्थ्यांना दीर्घकाळ बसची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून, विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा ही प्रश्न निर्माण होत असल्याने पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

# बँकेसमोरून दुचाकीची चोरी; अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ३१ जुलै

**शेगाव:** शहरातील इंडियन ओव्हरसीज बँके समोर उभी केलेली २५ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २९ जुलै रोजी घडली. याप्रकरणी शेगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपाल विजय तायडे (३७, रा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शेगाव) यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ विशाल विजय तायडे हा २९ जुलै रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास एमएच २८ एव्ही ०४२९ क्रमांकाची दुचाकी घेऊन इंडियन ओव्हरसीज बँकेत कामानिमित्त गेला होता. त्याने दुचाकी बँकेसमोरील रस्त्यावर उभी करून बँकेत प्रवेश केला. काही वेळाने बाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्याच्या निदर्शनास आले. परिसरात तसेच शहरात शोध घेऊनही दुचाकी मिळून न आल्याने त्यांनी शेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून शेगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस अंमलदार गणेश वाकेकर करीत आहेत.

# जामोदमध्ये 'दुधाची धार' परंपरेचे जतन; ग्रामरक्षणाच्या श्रद्धेचा वारसा

## आषाढ पौर्णिमेनिमित्त शेकडो वर्षांची प्रथा

प्रतिनिधी ३१ जुलै

**जळगाव जामोद:** तालुक्यातील जामोद येथे आषाढ पौर्णिमेनिमित्त शेकडो वर्षापासून सुरू असलेली 'दुधाची धार' ही धार्मिक व पारंपरिक प्रथा यंदाही बुधवारी भक्तिभावात पार पडली. गावावर रोगराई, महामारी किंवा नैसर्गिक संकट येऊ नये, तसेच ग्रामस्थांना सुख, समृद्धी आणि निरोगी आयुष्य लाभावे, या श्रद्धेतून देशी गायीचे दूध, तूप आणि बेंबळेश्वर मंदिरातील पवित्र कुंडाच्या पाण्याची धार गावाच्या सीमेवर सोडण्यात आली.

स्थानिकांच्या माहितीनुसार सुमारे ३०० ते ३५० वर्षापूर्वी या परंपरेची सुरुवात झाली. आषाढ पौर्णिमेच्या दिवशी प्रथम धार्मिक विधी पार पाडून दूध, तूप आणि पवित्र पाण्याचे मिश्रण विशेष छिद्र केलेल्या कळशीत भरले जाते.

त्यानंतर गावाच्या संपूर्ण सीमेवर प्रदक्षिणा घालत अखंड धार सोडली जाते.

### जामोद येथील विधीचे धार्मिक महत्त्व

या विधीसाठी देशी गायीचे दूध, तूप आणि बेंबळेश्वर मंदिरातील पवित्र कुंडाचे पाणी वापरले जाते.

विशेष छिद्र केलेल्या कळशीतून गावाच्या सीमेवर धार सोडत प्रदक्षिणा घालण्याची परंपरा असून, या विधीमुळे गाव रोगराई आणि संकटांपासून सुरक्षित राहते, अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

# वर्णा फाटा येथे दुचाकी अपघातात जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू

प्रतिनिधी ३१ जुलै

**खामगाव:** बुलढाणा मार्गावरील वर्णा फाटा येथे झालेल्या दुचाकी अपघातात ६८ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी २९ जुलै रोजी खामगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २१ जुलै रोजी सकाळी सुमारे १०:३० वाजता मंगल सुदाम तायडे (३९, रा. काळेगाव) हे त्यांचे सासरे दिनकर निनाजी खंडारे (६८) यांच्यासह मोटारसायकलने रोहणा येथून काळेगावकडे जात होते. दरम्यान, वर्णा फाटा येथे समोरून येणाऱ्या एमएच-३० वाय ९१५७क्रमांकाच्या दुचाकीवरील चालक मंगेश कैलास वाकुडकार (रा. दिवठाणा) याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात मंगल तायडे जखमी झाले, तर दिनकर निनाजी खंडारे हे गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर जमलेल्या लोकांनी त्यांना खामगाव येथील रुग्णालयात दाखल केले होते.

मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित चालक घटनास्थळावरून पसार झाला. प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१), १२५ (अ) तसेच मोटार वाहन अधिनियम कलम १३४/१७७ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार भगवान काळबाघे करीत आहेत.

# ईश्वर ठाकूर यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

प्रतिनिधी ३१ जुलै

**खामगाव:** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य (विदर्भ विभाग) या पदावर ईश्वरशिह ठाकूर यांची संघटनेचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी, यांचे सुचनेनुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

ईश्वरसिह ठाकूर ते रजिस्टर असणारी प्रेस क्लब खामगावचे मागील आठ वर्षापासून सचिव पदावर कार्यरत आहे. संघटनेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवले आहेत त्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेने



त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. निश्चितच संघटनेच्या ध्येय धोरणाच्या आधीन राहून कार्यक्षेत्रात संघटना मजबूत करतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ड्रोन सर्वे झाला; मग हजारो नागरिकांचे पीआर कार्ड कुठे अडकले?

## ५५ ते ६० टक्के नागरिक अजूनही वंचित

प्रतिनिधी ३१ जुलै

**साखरखेर्डा:** केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी स्वामित्व (महास्वामित्व) योजनेअंतर्गत सिंदखेडराजा तालुक्यातील गावांमध्ये २०२०-२१ दरम्यान ड्रोनच्या माध्यमातून गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणानंतर भूमी अभिलेख विभागाने पीआर कार्ड (मालमत्ता पत्रक/सनद) वाटप सुरू केले. मात्र, दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही तालुक्यातील केवळ ३५ ते ४० टक्के नागरिकांनाच पीआर कार्ड मिळाले असून, तब्बल ५५ ते ६० टक्के नागरिक आजही या महत्त्वाच्या दस्तऐवजापासून वंचित आहेत.

पीआर कार्ड नसल्यामुळे गावठाणातील मालमत्तेची खरेदी-विक्री, वारसा नोंदी, बँक कर्ज, नाव फेरफार तसेच इतर अनेक शासकीय व कायदेशीर कामे रखडली आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून त्यांच्यात तीव्र नाराजी आहे. भूमी अभिलेख विभागाने अनेक गावांमध्ये सनद वाटपाचे कार्यक्रम आयोजित केले. मात्र, ज्यांची घरे ड्रोन सर्वेक्षणात समाविष्ट झाली नाहीत किंवा तांत्रिक कारणांमुळे नोंद प्रलंबित राहिली, अशा हजारो नागरिकांना आजही पीआर कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे स्वामित्व योजनेचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचण्याऐवजी अनेक नागरिक अर्ध्यावरच अडकून पडल्याचे चित्र आहे. शासनाने स्वामित्व योजनेची घोषणा करताना प्रत्येक गावठाणधारकाला मालमत्तेचा कायदेशीर पुरावा मिळेल, असा विश्वास दिला होता. मात्र, प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर नागरिक वंचित राहिल्याने या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# शेगावात 10 नवीन जिजाऊ बसेसचा शुभारंभ

प्रतिनिधी ३१ जुलै

**शेगावः** सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने १० नवीन जिजाऊ बससेवेचा शुभारंभआमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते ३० जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या बसमुळे महिला, विद्यार्थिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

यावेळी विविध मान्यवर, अधिकारी, लोकप्रतिनिधी व




नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या बससेवेचे पूजन करून फीत कापून आ. कुटे यांनी बसचे लोकार्पण केले. 'शेगाव हे संतनगरी असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक येतात. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. या दहा नवीन जिजाऊ बसेसमुळे महिला, विद्यार्थिनी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि वेळेची बचत करणारा ठरेल. विकासकामांबरोबरच नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, भविष्यातही शेगावच्या सर्वांगीण

विकासासाठी आवश्यक निधी व सुविधा आणण्याचा प्रयत्न सुरू राहील.' असे मत आ. डॉ. संजय कुटे यांनी व्यक्त केले. या नव्या बससेवेच्या प्रारंभामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार असून, नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

संतनगरी शेगावमध्ये आधुनिक व लोकाभिमूख सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. यावेळी न. प. उपाध्यक्ष वैशाली सूळ, भाजपा नेते गोविंदराव मिरगे, संतोष देशमुख, ज्ञानेश्वार साखरे, अशोक डांबे, सचिन ढमाळ, सौ. पुजा खानापुरे, सौ. सुचिता काळे, अंकुश अकुश देशमुख, विनोद मसने, रवींद्र उन्हाळे, राजेश जमाव, अनंता बरडे, विजय बूच, प्रमोद काठोळे यांच्यासह शिवसेना तालुकाप्रमुख रामेश्वर थारकर, शहरप्रमुख शुभम ढगे, गोपाल बोरसे, मोहन लांजुळकर आदी उपस्थित होते.

# दुभाजकाची स्वच्छता; वाढलेल्या झाडांची छाटणी

## अपघात टाळण्यासाठी प्रशासनाची कारवाई

प्रतिनिधी ३१ जुलै

**खामगाव:** खामगाव-शेगाव मार्गावरील रस्ता दुभाजकातील वाढलेल्या झाडांची छाटणी करून परिसराची स्वच्छता संबंधित प्रशासनाकडून करण्यात आली. दुभाजकाजवळ साचलेली माती, गाळ आणि कचऱ्याची ही विल्हेवाट लावण्यात आल्याने या मार्गावरील वाहतुकीस काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. अपघातांचा धोका कमी करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.खामगाव-शेगाव हा जिल्ह्यातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या रस्त्यावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने प्रवास करतात. गेल्या काही महिन्यांपासून दुभाजकातील झाडे आणि झुडपे मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहनचालकांच्या दृष्टीस अडथळा निर्माण होत होता.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने दुभाजकातील वाढलेली झाडे आणि झुडपे यांची छाटणी केली. यासोबतच दुभाजकाजवळ साचलेली माती, गाळ, प्लास्टिक कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू हटवून परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे रस्त्याचे सौंदर्य ही खुलले असून वाहतुकीची दृश्यता सुधारण्यास मदत झाली आहे. अशा प्रकारची देखभाल नियमितपणे करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पावसाळ्यात झाडांची वाढ झपाट्याने होत असल्याने स्वच्छता मोहीम राबविल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे मत वाहनचालकांनी व्यक्त केले.

### नागरिकांच्या तक्रारींची दखल


विशेषतः चौक, वळणे आणि यू-टर्नच्या ठिकाणी समोरून येणारी वाहने दिसण्यास अडचण निर्माण होत असल्याने अपघाताची शक्यता वाढली होती. याबाबत वाहनचालक आणि नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# मुसळधार पावसाने अकोट तालुका वेढला; पिके पाण्याखाली, सखल भाग जलमय



## जिजामाता चौक-रेल्वे स्टेशन मार्गावरील खड्ड्याला नाल्याचे स्वरूप; नागरिकांत संताप

प्रतिनिधी ३१ जुलै

**अकोट :** गेल्या दोन दिवसांपासून अकोट शहरासह संपूर्ण तालुक्यात सुरू असलेल्या संततधार व मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांतील रस्ते जलमय झाले असून सखल वस्त्यांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे, अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा आर्थिक संकट उभे ठाकले आहे.बुधवारी रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने गुरुवारी आणि शुक्रवारीही जोर कायम ठेवला. दाट ढगांच्या आच्छादनामुळे सूर्यदर्शन झाले नाही. शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवरून पाण्याचे प्रवाह वाहताना दिसून आले. बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ कमी झाल्याने व्यवहारांवरही परिणाम झाला.

### शेतकऱ्यांची चिंता वाढली

सुरुवातीला या पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळाल्याचे चित्र होते. मात्र, सलग आणि जोरदार पावसामुळे आता अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. सोयाबीन, कापूस व तूर पिकांच्या क्षेत्रात पाणी साचल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी शेतांमध्ये अक्षरशः तळ्याचे स्वरूप निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. यापूर्वी पावसाच्या खंडामुळे दुबार पेरणी करावी लागलेल्या शेतकऱ्यांना आता अतिपावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

### नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले

तालुक्यातील अनेक गावांमधील नदी-नाले प्रवाहित झाले असून लहान-मोठ्या जलस्रोतांमध्ये पाण्याची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. धरणांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची नोंद नाही.अकोट शहरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये नाले व गटारींची साफसफाई अपूर्ण असल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. गाळ व कचऱ्यामुळे पाण्याचा नैसर्गिक निचरा होत नसल्याने अनेक ठिकाणी पाणी साचत आहे. आणखी काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने नालेसफाई मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### जिजामाता चौकातील खड्डा बनला 'नाला'

अकोट शहरातील जिजामाता चौकातून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील मोठा खड्डा सध्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. सततच्या पावसामुळे या खड्ड्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचून त्याला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.वाहनचालकांना खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप केला जात आहे.

### तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

शहरातील सखल भागांतील पाणी त्वरित काढणे, नाले व गटारींची साफसफाई पूर्ण करणे, धोकादायक खड्डे बुजविणे तसेच पाण्याखाली गेलेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी नागरिक व शेतकरी करीत आहेत. पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सततच्या पावसाने पिकांना संजीवनी

दोन दिवसांपासून पडत असलेल्या सततच्या पावसामुळे कोमेजत चालेल्या पिकांना संजीवनी मिळाली आहे. शेतकरी वर्गाला खरीप हंगाम हातातून जातो की काय अशी भीती वाटत असतानाच ऐनवेळी पाऊस आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



# दिव्याखाली अंधार

## रेन वॉटर हार्वेस्टिंगचा फज्जा, उड्डाणपुलावरून गळती

प्रतिनिधी ३१ जुलै

**अकोला:** एकिकडे महानगरपालिका शहरातील नागरिकांना रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्याचे आवाहन करत 'पर्यावरण संवर्धना'चे धडे देत आहे. मात्र, दुसरीकडे खुद्द मनपाच्याच मुख्य इमारतीत या यंत्रणेची दुरवस्था झाल्याचे उघडकीस आले आहे. तर त्याच वेळी उड्डाणपुलाच्या खालून जाणाऱ्या अकोलेकरांवर जलाभिषेक होत आहे.

महापालिका आयुक्त कार्यालयाच्या इमारतीवरील रेन वॉटर हार्वेस्टिंगची यंत्रणा पार कोलमडली असून, पावसाचे पाणी थेट कार्यालयातच गळू लागल्याने महापालिकेच्या कारभाराचे 'तीन तेरा' वाजल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पावसाचे पाणी वाचवण्यासाठी प्रशासनाने कोट्यवधींचा खर्च करून स्वतःच्या इमारतींवर जलपुनर्भरण यंत्रणा उभारली होती. मात्र, योग्य निगराणी आणि देखभालीअभावी ही यंत्रणा आता धूळ खात पडली आहे.

नुकत्याच झालेल्या पावसामुळे मनपा आयुक्त कार्यालयाच्या छतावर साचलेले पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या पाईपमधून जमिनीत जाण्याऐवजी थेट प्रशासकीय इमारतीत आणि आयुक्तांच्या दालनाजवळ गळू लागले. इतकेच नाही तर शहरातील उड्डाणपुलाखालून जाताना अकोलेकरांना पावसाच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. अचानक उड्डाणपुलावरुन पडणाऱ्या या पावसामुळे अनेकांचे मोबाईल ओले चिंब झाले आहे. महापालिका, राष्ट्रीय राजमार्ग प्रबंधन यांनी या उड्डाणपुलांच्या पाईपची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे.

# टँकरमधून गॅस चोरीप्रकरणी चार आरोपींवर गुन्हा दाखल

## स्थानिक यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ३१ जुलै



**खामगाव रू** टँकर मधून एलपीजी गॅसची चोरी करून तो सिलिंडर मध्ये भरून विक्री करणाऱ्या रॅकेट वर अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या राज्य दक्षता पथकाने बुधवारी (दि. २९ जुलै) रात्री सुदर्शन ढाब्या जवळ धडक कारवाई केली. याप्रकरणी चार आरोपींविरुद्ध खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राज्य दक्षता पथकाला टँकरमधील एलपीजी गॅस प्रथम साठवण टँकमध्ये भरून त्यानंतर सिलिंडरमध्ये भरून अवैधरित्या विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार अन्न व पुरवठा विभागाचे नियंत्रक चंद्रकांत डांगे व उपनियंत्रक गणेश बेल्लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून रात्री छापा टाकला. या छाप्यात तब्बल ८६ लाख ६५ हजार ४३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, बाहेरून आलेल्या पथकाने ही कारवाई केल्याने स्थानिक यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. याप्रकरणी प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी रुपेश विजय बिजेवार यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी रवी ज्ञानेश्वर वायभासे, राकेश, रमेश, (एपी २९ व्ही ०५४६) या टँकरचे चालक व मालक, एलपीजी टँकर (एमएच ४३ सीके ५४७०) चे मालक गुरप्रीत सिंग सैनी तसेच अवैध व्यवसायाशी संबंधित इतरांवर अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३, ७ व ८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला आहे.या कारवाईत सहायक नियंत्रक प्रदीप काळे, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे, जिल्हा पुरवठा अधिकारी रूपेश बिजेवार, राज्य दक्षता पथकातील निरीक्षक रामराजे भोसले, राजीव भेले, चंद्रकांत कांबळे, अमोल बुरटे, रवींद्र राठोड, दीपेंद्र परूळेकर, देवानंद थोरवे, विकास नागदिवे आदींनी सहभाग घेतला होता.

# हिवरखेड येथील बसस्थानकाला पाण्याचा वेढा

प्रतिनिधी ३१ जुलै

**हिवरखेड :** हिवरखेडमधील सिद्धार्थ नगर भागातील लेंडी नाल्यावरील पूल अत्यंत जीर्ण झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने पूर आल्यावर दोन्ही प्रभागांचा संपर्क तुटतोय. प्रशासनाने तातडीने मोठा पूल न उभारल्यास आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला. हिवरखेड नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ६ मध्ये येत असलेल्या सिद्धार्थ नगरातील लेंडी नाल्यावरील हा तोच पूल आहे, जो आता पूर्णपणे कालबाह्य झालाय. हा पूल प्रभाग क्रमांक ५ आणि ६ च्या सीमेवर असल्याने दिवसभर या मार्गावर नागरिकांची मोठी रहदारी असते. मात्र, सध्या पावसाचे दिवस सुरू असल्याने नाल्याला पूर येतो आणि पाणी थेट पुलावरून वाहू लागतं.

### मुर्तिजापूर येथे 'रानभाजी महोत्सवचे आयोजन

**मुर्तिजापूर :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त कृषी विभाग अंतर्गत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), यांच्या वतीने रानभाजी महोत्सव-2026 चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव शनिवार ,१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत नगर परिषद , मुर्तिजापूर येथे होणार आहे. शेतशिवारातील नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या रानभाज्यांचे महत्त्व व आरोग्यविषयक माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या महोत्सवाचा उद्देश असून, उपस्थितांना विविध रानभाज्यांचे प्रदर्शने आणि माहिती मिळणार आहे.




# अकोटात गुटख्यावर धडक कारवाई; 29.54 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३१ जुलै



**अकोट :** सहायक पोलीस अधीक्षक अकोट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या धडक कारवाईत शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारे वाहन जप्त करण्यात आले. या कारवाईत एकूण २९ लाख ५४ हजार २०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २९ जुलै रोजी रात्री सुमारे ९.१५ वाजता सहायक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांना गुप्त माहिती मिळाली की, एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहनातून अकोटहून दर्यापूर रोडमार्गे प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक केली जाणार आहे. या माहितीच्या आधारे सहायक पोलीस अधीक्षकांनी कार्यालयातील वाचक फौजदार शामकुमार बुंदेले व पोलीस पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस कर्मचारी व आरसीपी पथकाने दोन पंचांसह दर्यापूर रोडवरील कोल्हे हॉस्पिटलजवळ नाकाबंदी केली.

नाकाबंदी दरम्यान अकोला नाक्यावरील पुलाकडून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप वाहनाला थांबविण्याचा इशारा करण्यात आला. मात्र, वाहनचालकाने संशय आल्याने अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. त्यानंतर वाहनाची पंचांसमक्ष तपासणी करण्यात आली. तपासणीत वाहनामध्ये विमल, पान पराग, पान बहार आदी कंपन्यांचा प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखू आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गुटखा व तंबाखूची किंमत १७ लाख ५४ हजार २०४ रुपये असून, बोलेरो पिकअप वाहनाची किंमत १२ लाख रुपये आहे. अशा प्रकारे एकूण २९ लाख ५४ हजार २०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# महाव्यवस्थापकांच्या आदेशालाच हरताळ?

प्रतिनिधी ३१ जुलै

**अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी बायपास मार्गाने धावणाऱ्या बसांना बाळापूर बसस्थानकात नेऊन प्रवाशांची चढ-उतार करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही काही चालक-वाहकांकडून या आदेशाकडे दुर्लक्ष होत असल्याचा प्रकार पुन्हा समोर आला आहे.

गुरुवारी नागपूर–शेगाव मार्गावरील एमएच-४० सीएम-६४४२ या एसटी बसमधील बाळापूर व शेगावकडे जाणाऱ्या प्रवाशांना सुरुवातीला अकोला बसस्थानकात उतरविण्याचा प्रयत्न करण्यात आला."ही बस बाळापूरला जात नाही," असे चालक-वाहकांनी सांगितल्याचा प्रवाशांचा आरोप आहे. यावेळी प्रवाशांनी तीव्र आक्षेप घेत आरडाओरडा केला.

महाव्यवस्थापकांच्या आदेशाची प्रत असल्याचे सांगत बस बाळापूर बसस्थानकात नेण्याची मागणी त्यांनी लावून धरली. अखेर प्रवाशांच्या तीव्र विरोधानंतर चालकाने बस बाळापूर बसस्थानकात नेली आणि तेथे प्रवाशांची चढ-उतार करण्यात आली. महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी यापूर्वीच विभाग नियंत्रकांना बायपास मार्गाने धावणाऱ्या सर्व बसफेऱ्या बाळापूर बसस्थानकात नेऊन प्रशासनाने आदेश दिल्यानंतरही प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही.

नगर पंचायत महागाव

ता. महागाव, जि. यवतमाळ, पिन : 445205

Mail : npmahagaon@gmail.com संपर्क क्र. : 9765996599

जा.क्र. नपम/आवि/ ४०४/२०२६ दिनांक : 30/07/2026

सार्वजनिक सूचना

घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 ची अंमलबजावणी बाबत

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाकणेंह्र दि. 29 जानेवारी, 2021 अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 (मिनिस्ट्री कचरा तसेच अन्य कचरा नियम ही पूर्वीचे 2021 मधील अधिसूचित आहेत) तुसार सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गुर्होधद्रूसोसायटी, आरक्षणना, शासकीय/मिर्वबत तसेच मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणारे व्यक्ती (Bulk Waste Generators) यांनी खालील कचऱ्यांचे वर्गीकरण येथ क्रम्र्द बंधनकारक आहे.

याचे नियमांचे पालन न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 194(5)/2023 प्रमाणे आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| अ.क्र. | कचऱ्याचा प्रकार | तपशील समाविष्ट घटक |
|---|---|---|
| 1 | ओला कचरा | अन्न, भाजीपाल्यांचे अवशेष, फळांची साल, स्वयंपाक घरातील कचरा. |
| 2 | सुका कचरा | प्लास्टिक, कागद, धातू, काच, कपडे, बाटल्या. |
| 3 | सॅनिटरी कचरा | डायपर्स, सॅनिटरी नैपकिन्स, टिश्यू पेपर, बँडेज. |
| 4 | धोकादायक/विशेष कचरा | बॅटरी, बल्ब, विद्युत उपकरणांचे अवशेष, रंग, रसायने, ई-कचरा. |

नागरिकांनी पालन करावयाच्या सूचना :

- घरगुती कचरा ओला व सुका अशा प्रकारे दररोज वर्गीकरण करून स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे द्यावा किंवा घटागाडीत स्वतंत्र डब्यात टाकावा.
- धोकादायक/विशेष कचरा स्वतंत्रपणे गोळा करून नगर पंचायत कार्यालय किंवा निर्धारित संकलन केंद्रावर द्यावा.
- कचरा जाळणे, नाले /रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळावे.
- नगर पंचायतच्या कचरा संकलन सेवेचा सहकार्य करावे.

संस्थार्न/व्यापाऱ्यांनी पालन करावयाच्या सूचना :

- आपला कचरा (किमान ओला व सुका) वर्गीकरण करून, अधिक प्रमाणात असल्यास पुढील प्रक्रिया करावी.
- पुनर्वापर करण्यायोग्य कचऱ्याचा विक्री/रिसायकल प्रक्रियेयर्थो निपटारा करावा.
- घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 चे काटेकोर पालन करावे.

Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांनी पालन करावे :

- हॉटेल्स, रेस्टॉरंट, मॉल्स, मोठी संस्था व आरक्षाणना यांनी रोजच्या घात्साठी 100 किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होत असल्यास दररोज 100 किलो किंवा त्यापेक्षा जास्त कचरा निममांनुसार प्रक्रियेसाठी व्यवस्था करावी किंवा नगर पंचायतसहे करार करावा.
- आपल्या कचऱ्यांचे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर किंवा निपटारा निम्मांतुसार करावा.
- नियमांचे उल्लंघन केल्यास दंड व/किंवा कायदेशीर कारवाई केली जाईल.

नियमांचे उद्दोशश स्वच्छता राखणे, संसाधनांचा पुनर्वापर करणे आणि पर्यावरण संरक्षण करणे हा असून, सर्व नागरिकांनी/संस्थांनी सहकार्य करावे. घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 चे काटेकोर पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

लोकप्रतिनिधी जबाबदारी

१. जनजागृती व मार्गदर्शन : नियमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, जागरूकता अभियान राबविणे.

२. देखरेख व पाठपुरावा : कचरा व्यवस्थापनांची नियमित पाळणी करणे व अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे.

3. सुविधा उपलब्ध करणे : कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया व पुनर्वापरासाठी आवश्यक सुविधा पुरवणे.

४. नियमांची अंमलबजावणी : नियमभंगावर दंडात्मक कारवाई होण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करणे.

5. सहभागी प्रशासन : स्वच्छ व सुंदर महागाव निर्मितीसाठी नागरिक, संस्था, व्यापारी आणि प्रशासनसोबत समन्वय साधणे.

स्वा./-
मुख्याधिकारी
नगर पंचायत महागाव

स्वच्छ महागाव – सुंदर महागाव – आपली जबाबदारी, आपला अभिमान !

# अकोट फैल रेल्वे पुलाचे भाग्य उजळणार!

## चार-पाच महिन्यात पुलाचे काम सुरू होण्याचे संकेत, मनपातील बैठकीत झाला पुलाच्या कामासंदर्भात खल

प्रतिनिधी ३१ जुलै



**अकोला :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत येणाऱ्या अकोट फैल येथील रेल्वे रुळावरील जुना पूल काढून नवीन पुलाचे बांधकाम करण्याचे संकेत असून, येत्या चार-पाच महिन्यात कामाला सुरूवात होणार असल्याचे अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली मनपा आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीतून शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्या संदर्भात आवश्यक त्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने, मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजपा महानगराध्यक्ष जयंत मसने यांची उपस्थिती होती. या बैठकीत खासदार अनुप धोत्रे यांनी ऑनलाईन सहभाग घेत पुलासंदर्भातील संपूर्ण आढावा घेतला असून नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत त्या भागातील वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने तेथील पाहणी करून निर्णय घेण्यासाठीच्या सुचना दिल्या, तसेच सदर भागातील नागरिकांना या कामामुळे त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी सुचना दिल्या. तसेच नगर रचना विभागाकडून संपूर्ण स्थळाची पाहणी करून देऊन या कामाशी संबंधीत अधिकाऱ्यांशी संपर्क करून समन्वय करण्याची सूचना यावेळी आमदार रणधीर सावकर यांनी दिल्या. येणाऱ्या ४ ते ५ महिन्यात पुलाचे काम सुरू होण्याचे संकेत यावेळी अधिकाऱ्यांनी दिले. तद्नंतर तात्काळ सदर ठिकाणची उपस्थित अधिकाऱ्यांव्दारे पाहणी करण्यात आली आहे.

### अकोट फैल रेल्वे पूल ब्रिटीशकालीन

शहरातील महत्त्वाचा पूल असलेल्या अकोट रेल्वे पुलाची हालत अत्यंत खराब झाली आहे. हा पूल ब्रिटीशकालीन असून, तो जीर्ण झाल्याने तातडीने नवीन पुलाची निर्मिती करणे गरजेचे असतानाही त्याचीच डागडुजी करणे सुरू होते. अखेर आता मनपाच्या बैठकीत या पुलाविषयी मंथन झाल्यानंतर लवकरच या पुलाचे भाग्य उजळणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### पर्यायी मार्गाचे मनपासमोर राहणार आव्हान

या पुलाचे काम सुरू केल्यास या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. मात्र सध्या कोणताच पर्यायी मार्ग सुस्थितीत नसल्याने मोठी अडचण निर्माण होऊ शकते. कारण तापडीया नगरातील रेल्वे उड्डाणपुलाचे अजूनही भिजत घोंगडे असल्याने तो पूल पर्यायी मार्ग ठरू शकणार नाही. इतर मार्गही दूर असल्यामुळे पर्यायी मार्गाचे मनपासमोर मोठे आव्हान राहणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135